# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००९ |
| वर्ष | : | दहावे |
| अंक | : | ६ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १४१**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष दहावे / अंक ६ / मे २००९

## संपादकीय

## शिक्षण म्हणजे शाळा हे समीकरण चुकीचे आहे

शिक्षण या विषयावर खूप बोलणे, हा सध्या एक चांगला धंदा झालेला आहे. विशेषतः रविवारच्या वृत्तापत्रांमधून शिक्षणाबाबत जे लेख प्रकाशित होतात, त्यावरून याची प्रचीती येते. शिक्षणाचा अधिकार, मोफत शिक्षण, परिक्षा पद्धतीतील त्रुटी, प्रवेश समस्या, शुल्क यांचा वकिली तर्कांने भरमसाट उहापोह केला जातो. 'शिक्षण प्रक्रियेतून प्रगल्भ नागरिक घडलाच नाही', 'शिक्षण व जीवन मूल्यांची फारकत' हे व असे मथळे म्हणजे वाचकांना आकर्षित करण्याची क्लृप्ती होऊन बसली आहे. याच्या जोडीला या लिखाणामधून प्रचंड आकडेवारी, लैंगिक शिक्षणाचे महत्त्व, मेकॉलेचा उद्धार या गोष्टी तोंडी लावायला घेतल्या जातात.


वास्तविक पाहता, या प्रकारचे लेखन करणाऱ्या सर्व लेखकांचा एक समज आहे की, शिक्षण म्हणजे शाळा. त्यामुळे अशा लेखनातील चर्चा या बहुतांशी शाळा, परीक्षा, निकाल अशा मुद्द्यांभोवती फिरत राहतात. वास्तविक शिक्षण ही एक जन्मापासून मरेपर्यंतच्या प्रवासातील कायम स्वरूपी घडणारी प्रक्रिया आहे. जीवनातील व्यवहारांमधील अनेक घटना, नात्यागोत्यांमधील संबंध, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी अशा बाबींशी टक्कर देत, निर्णय क्षमता निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण असते.

गरम वस्तूला हात लावला की चटका बसतो. हा अनुभव घेतल्याशिवाय शिकता येत नाही. सरोद, तबला, पेटी या वाद्यांची चित्रे पाहून ती निर्माण करत असलेली सुरांची किमया अनुभवता येत नाही. जीवनातील प्रत्येक टप्प्यावर स्वार्थ, मत्सर, लोभ, त्याग या मूल्यांच्या फायद्या-तोट्यांचा हिशोब अनुभवता येतो. यातील सर्वांत महत्त्वाचे माध्यम माणूस असतो. जीवन सुसह्य करण्यासाठी व्यापक हित लक्षात घेऊन काही नीतीमूल्यांची जडणघडण केलेली असते. या रचनेत अनेकदा स्वातंत्र्यावर, क्षमतेवर बंधने आणायला लागतात. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात जबाबदाऱ्यांचे स्थित्यंतर काही क्षणांत होत असते. युवा - युवती एका दिवसात पती-पत्नी होतात. कालांतराने थोड्या अवधीत अपत्याला जन्म दिल्यावर ते आईवडील होतात.

(पृष्ठ क्रमांक ४० वर)


# विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर

७ मे रोजी रवीन्द्रनाथ टागोरांची जयंती त्यानिमित्ताने



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर, ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा, एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंसं, मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी, माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी, एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर




वर्ष दहावे / अंक ६ / मे २००९

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १४ वे / अंक ११ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | तुर्पाणची संस्मरणीय सहल | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| २) | निसर्गरम्य अंदमान - एक पवित्र तीर्थक्षेत्र | श्री. सुरेन्द्र लागू | ९ |
| ३) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १४ |
| ४) | संगीत - संन्यस्त ज्वालामुखी | श्रीमती आशा भिडे | २० |
| ५) | सत्संग | श्री. यशवंत माने | २३ |
| ६) | एक तरी 'वारी' अनुभवावी (वारी : एक शोध - वृत्तांत) | श्री. सचिन गराटे | ३१ |
| ७) | मोर : माणसाच्या जीवनातला | श्री. मोहन पाठक | ३५ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ४३ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ''**विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा**'' या नावाने पाठवावा.

# तुर्पाणची संस्मरणीय सहल

*चीनच्या प्रवासवर्णनातील तुर्पाणच्या वर्णनाचा हा भाग. डॉ. आगरकर यांच्या ओघवत्या शैलीमुळे ही प्रवासवर्णने आवडल्याचे अनेक वाचकांनी सांगितले - संपादक*

चीनच्या विज्ञान प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी ऊरुम्चीला येण्याचे निमंत्रण आले तेव्हा हे शहर नेमके कोठे आहे याची आधी माहिती आम्ही मिळविली. त्याचबरोबर या शहराजवळ कोणती प्रेक्षणीय स्थळे आहेत हे देखील जाणून घेण्याचा आम्ही प्रयत्न केला. इंटरनेटवरून आम्ही माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत होतो. त्यासाठी वेगवेगळ्या संकेतस्थळांना आम्ही भेटी दिल्या. त्या सगळ्यांमध्ये तुर्पाण या गावाचा उल्लेख आढळत होता. त्यामुळे ऊरुम्चीच्या भेटीत तुर्पाणला जायला मिळाले तर फार छान होईल असे आम्हांला वाटत होते. ऊरूम्चीच्या आठवडाभराच्या मुक्कामातील एक दिवस तुर्पाण भेटीसाठी राखून ठेवलेला आहे हे जेव्हा आम्हांला कळले तेव्हा आम्हांला खूप आनंद झाला. आमच्या वास्तव्याचा शेवटचा दिवस तुर्पाण भेटीसाठी निश्चित केलेला होता. तोपर्यंत विज्ञान प्रदर्शनाचा ताण कमी झालेला होता. आंतरराष्ट्रीय प्रवेशिकांमध्ये आमच्या प्रयोगाला बक्षीस मिळाले असल्याने आम्ही सर्वजण खुषीत होतो. ऊरुम्ची आणि तुर्पाण हे अंतर सुमारे दीडशे किलोमीटर एवढे आहे. म्हणून अगदी सकाळीच निघायचे ठरविण्यात आले होते. आमच्या सोयीसाठी हॉटेल मॅनेजरला विनंती करून अगदी सकाळी नाश्त्याची सोय करण्यात आली होती. परंतु त्यादिवशी नाश्ता घ्यायचा नाही, असे आम्ही ठरविले होते. याचे कारण आम्ही भारतातून बांधून नेलेल्या खाद्यपदार्थांपैकी अनेक पाकीटे जशीच्या तशीच होती. दुसऱ्या दिवशी आमचा परतीचा प्रवास सुरू होणार होता. इथून नेलेले खाण्याचे पदार्थ परत येथे आणणे योग्य ठरले नसते. ऊरुम्ची येथील वास्तव्यात आम्ही सर्वांनीच बरीच खरेदी केलेली होती. त्यामुळे आमच्या बॅगेत जागाच शिल्लक नव्हती. नाश्ता न करताच वेळेच्या आधी आम्ही बसजवळ जाऊन उभे राहिलो. आमच्या बसचालकाने दार उघडताच उडी मारून मी बसमध्ये चढलो आणि चालकाजवळच्या सीटवर बसलो. वाहनात पहिल्या सीटवर बसायला मला नेहमीच आवडते. येथून पुढचे दृश्य स्पष्ट दिसते. आपल्याला हवी ती छायाचित्रे येथून चांगल्या प्रकारे काढता येतात.


शहराची सीमा पार करून आमची बस तुर्पाणच्या दिशेला लागली. गावात सर्वत्र हिरवळ आहे. गावाच्या बाहेर पडताच चित्र संपूर्ण पालटते. आपण वाळवंटात येतो. दोन्ही बाजूला रेती आणि दगडाचे साम्राज्य दिसते. पाण्याचा मागमूस नाही की गवताचे पाते नाही. परंतु या वाळवंटातून जाणारा रस्ता मात्र अतिशय गुळगुळीत आहे. ऊरुम्ची ते तुर्पाण हा संपूर्ण रस्ता चौपदरी आहे. कुठेही खड्डा नाही की रस्त्याला खडबडीतपणा नाही. पोटातले पाणी हलणार नाही. अशा पद्धतीने संपूर्ण प्रवास होतो. गाडीचा वेग ११० ते १४० किमी. प्रति तास इतका प्रचंड असतो. तरीही वेगाची आपल्याला जाणीवदेखील होत नाही. साधारणपणे अर्धा तास प्रवास केल्यानंतर दूरवर पवनचक्क्या दिसू लागतात. जसजसे जवळ जावे तसतसे अधिकाधिक पवनचक्क्या दिसतात. त्याचबरोबर त्यांचे महाकाय रूप लक्षात येते. वाळवंटातून वाहणाऱ्या वाऱ्यापासून वीज निर्माण करण्यासाठी या पवनचक्क्या उभारलेल्या आहेत. त्यांचे जवळून दर्शन व्हावे यासाठी आमच्या चालकाने बस थांबवली. आम्ही सर्वजण खाली उतरलो. त्यामुळे पवनचक्क्या अगदी जवळून आम्हांला पाहता आल्या. पवनचक्क्या खूपच उंच असून त्यांच्या पात्यांचा आकार

बराच मोठा असल्याचे आमच्या लक्षात आले. साधारपणे १५ मिनिटात सर्वजण बसमध्ये परत आले आणि आमचा पुढचा प्रवास सुरू झाला.

पवनचक्क्या ओलांडून आम्ही तुर्पाणकडे प्रस्थान केले तसे आजूबाजूचे दृश्य बदलत असल्याचे आमच्या लक्षात आले. दूरवर डोंगर दिसू लागले. डोंगराच्या माथ्यावरील पांढऱ्या रंगाचा बर्फ सूर्याच्या उन्हाने चकाकत होता. आमच्या पुढे एक लहानशी टेकडी दिसू लागली. तुर्पाण आले. त्या टेकडीवर थोडीशी हिरवळ असल्याचे जाणवले. त्याचबरोबर टेकडीच्या पायथ्याशी एक जलाशय असल्याची कल्पना आम्हांला आली. या जलाशयामुळे आजूबाजूला गवत आणि लहान झुडपे वाढलेली होती. काही खोलगट भागात पिके दिसू लागली. दूरवर मेंढ्या चरताना दिसत होत्या. हे पाहून मंगोलियातील मेंढपाळ या परिसराला 'कुरण' का म्हणत असावेत याची कल्पना आली. लवकरच आम्ही डोंगरात प्रवेश केला. डोंगरावर तुरळक झाडे होती. परंतु बराचसा डोंगर बोडकाच होता. या डोंगरातून चारपदरी रस्ता काढलेला होता. आवश्यक तेथे पूल बांधलेले होते. त्यामुळे कुठेही बसचा वेग कमी करावा लागला नाही. साधारणपणे अर्धा तास आमचा प्रवास डोंगरदऱ्यातून चालू होता. त्यानंतर मात्र येरे माझ्या मागल्या, पुन्हा वाळवंटच, अगदी तुर्पाणला पोहोचेपर्यंत. साधारणपणे तीन तासाच्या प्रवासानंतर आम्ही तुर्पाणला पोहोचलो. दुरून दिसणारी हिरवळ आणि उंच उंच घरे आपण इच्छित स्थळी पोहोचल्याची आगाऊ सूचना देत होते. गावात प्रवेश करण्यापूर्वी प्रथम पर्यटन स्वागत कक्षापाशी थांबावे लागते. तेथे वाहनाची नोंद केल्याशिवाय आणि प्रवेश फी भरल्याशिवाय वाहन गावात नेता येत नाही. आमच्या गाईडने ते सर्व सोपस्कार पार पाडले. तोपर्यंत आम्ही खाली उतरून इकडे तिकडे पाहून आलो. साधारणपणे २० मिनिटानंतर गाईड परत आला. त्याच्या सूचनेप्रमाणे आम्ही सर्वजण आपापल्या जागी बसलो आणि आमची तुर्पाण भेट सुरू झाली.

**करेझ संग्रहालय :**

आमचा पहिला थांबा होता करेझ संग्रहालय. एका प्रशस्त प्रवेशद्वारातून आम्ही प्रवेश केला. शेजारीच नाचणाऱ्या आणि गाणाऱ्या पथकाने आमचे स्वागत केले. द्राक्षाच्या मांडवातून आम्ही पुढे पुढे चाललो होतो. सर्वप्रथम पाहायला मिळते ते उघड्यावर ठेवलेल्या प्रदर्शनीय वस्तू. त्यात समावेश होता बैलगाडी, पाणी काढण्याची मोट या वस्तूंचा. ते पाहून आपण संग्रहालयाच्या इमारतीत प्रवेश करतो. या संग्रहालयात त्या परिसरात आढळणाऱ्या अनेक वस्तू ठेवलेल्या आहेत. संग्रहालयातील सर्वांत लक्ष वेधून घेणारी चीज म्हणजे जमिनीखालचे कालवे. तुर्पाण परिसरात द्राक्षाचे मळे आहेत. या मळ्यांना मोठ्या प्रमाणावर पाणी लागते. ते लांबून कालव्याच्या मदतीने आणले जाते. वाळवंटात जमिनीवर कालवे खोदले तर पाणी झिरपून जाईल आणि पाण्याची मोठ्या प्रमाणावर वाफ होईल. हे टाळण्यासाठी कालवे जमिनीखाली बांधलेले आहेत. जेथे जेथे पाण्याची गरज असेल तेथे विहिरी बांधून कालव्यातील पाणी वर उपसण्याची सोय केलेली असते. असाच एक



**करेझ संग्रहालयातील वस्तू**



करेझ संग्रहालयातील वस्तू

कालवा या संग्रहालयाच्या इमारतीच्या खालून जातो. तो प्रत्यक्ष पाहण्याची आपल्याला संधी मिळाली. बाहेरील वातावरण कोरडे असते. त्याचबरोबर बाहेर खूप उकडते देखील. परंतु कालव्याशेजारी गारवा जाणवतो. कालव्याचे दर्शन घेऊन द्राक्षाच्या मांडवाखालून आपण बाहेर पडतो. झाडाला पिकलेली द्राक्षे तोडून खाण्याची इच्छा अनावर होते. परंतु गाईडची सूचना 'द्राक्षे तोडू नका' अशी असते. त्याचबरोबर आपल्याला पुढे भरपूर द्राक्षे खायला मिळतील हे सांगायला तो विसरत नाही. त्यामुळे आपले मन मारून आपण त्याच्यामगे झपाझप पावले टाकीत संग्रहालयाच्या बाहेर पडतो.

संग्रहालयापासून १०-१५ मिनिटाच्या प्रवासानंतर दुसरा थांबा येतो. हा थांबा भग्नावस्थेतील शहराचे दर्शन घेण्यासाठी असतो. कधीकाळी येथे मोठे साम्राज्य असावे. त्यावेळच्या राजाने मोठे शहर वसविले होते. राजधानीच्या ठिकाणी असतात, अशा सर्व सुविधा तेथे असाव्यात. आता मात्र ही सगळी ठिकाणे भग्नावस्थेत आहेत. त्यांचे दर्शन घेण्यासाठी आपल्याला डोंगर चढून जावे लागते. जवळ जाताच घोड्याच्या पागा, दरबार, शयनगृह अशी ठिकाणे आपल्या नजरेस पडतात. जुन्या काळचे हे गाव खूपच मोठे असावे. त्याचबरोबर गावात बहुमजली इमारती असाव्यात याची आपल्याला जाणीव होते. ते गाव नेमके कसे असेल याचे एक कल्पनाचित्र तिथे ठेवलेले आहे. या चित्रावरून शहराच्या आजूबाजूला असणाऱ्या नद्या, डोंगरदऱ्या आणि कालवे याची कल्पना येते. मोठ्या संख्येने पर्यटक या भग्नावस्थेतील शहराचे दर्शन घेण्यासाठी येतात. खूप बसेस तेथे उभ्या असल्याचे आमच्या लक्षात आले. त्याचबरोबर शीतपेये विकणारी अनेक दुकाने तिथे आहेत. स्मरण म्हणून आपल्याला एखादी वस्तू खरेदी करावयाची असेल तर त्याचीही व्यवस्था तेथे आहे. सहलीच्या या ठिकाणाची देखभाल चांगल्या पद्धतीने करण्यात येत असावी. सगळा परिसर स्वच्छ आहे. आत जाण्याऱ्या आणि बाहेर येणाऱ्या पर्यटकांसाठी वेगवेगळ्या वाटा आहेत. किती पर्यटक आले याची नोंद ठेवण्याची सोय देखील आहे. प्राचीन संस्कृतीचे दर्शन आटोपून आम्ही शहरातल्या पुढच्या प्रेक्षणीय स्थळाकडे वळलो.

आमचे तिसरे प्रेक्षणीय स्थळ होते शहराच्या दुसऱ्या बाजूला वसलेले मिनार. दिल्लीत एक उंच असा कुतुब मिनार आहे. त्याच धर्तीचा परंतु जरा उंचीला कमी असे एक मिनार येथे बांधलेले आहे. मिनाराच्या शेजारीच एक मशीद आहे. सूर्याच्या रखरखत्या उन्हात आम्ही तेथे पोहोचलो. तेव्हा



**भग्न अवस्थेतील प्राचीन शहर**

मिनार आणि मशीदीची इमारत चकाकत होती. त्याचबरोबर पुढे लावलेल्या टाईल्सवरून देखील प्रकाशाचे परावर्तन होत होते. डोळ्यावर पडणारा प्रखर प्रकाश आणि वातावरणातील उष्णता यामुळे आम्हांला बसच्या बाहेर राहणे कठीण जात होते. तरीही नवीन ठिकाण पाहण्याचा उत्साह असल्याने आम्ही सभोवताली फेरफटका मारून आलो. संपूर्ण परिसर अतिशय चांगल्या पद्धतीने ठेवलेला आहे. जागोजागी फुलझाडे लावलेली आहेत, माहिती देणाऱ्या पाट्या लावलेल्या आहेत. पर्यटकांना खरेदी करता यावे यासाठी लहान सहान दुकांनांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.




**मिनार आणि त्याच्या शेजारची मशीद**

तीन स्थळांना भेटी देऊन होईपर्यंत पोटात कावळे ओरडायला लागले होते. त्यामुळे आमची बस हॉटेलच्या दिशेने जाऊ लागली. आतापर्यंत आम्ही गावाच्या बाहेर होतो. जेवायला जायच्या निमित्ताने आम्हाला तुर्पाण गाव बघण्याची संधी मिळाली. आम्हांला गावाचे चांगले दर्शन व्हावे यासाठी आमच्या चालकाने गावातून जाणारा रस्ता निवडला. वेगवेगळ्या रस्त्यावरून जाताना दोन गोष्टी आपले लक्ष वेधून घेतात. एकतर दुतर्फा लावलेली झाडे आणि दुसरे म्हणजे विजेचे खांब. एका सरळ रस्त्यावर एकाच प्रकारची झाडे लावलेली आहेत. त्याचबरोबर एकाच प्रकारचे विजेचे खांब लावलेले आहेत. या खांबांना विशिष्ट आकार देऊन आणि रंग लावून ते शोभिवंत केलेले आहेत. साधारणपणे २० मिनिटांच्या प्रवासानंतर आम्ही हॉटेलमध्ये पोहोचलो. हॉटेल कसले, तेही एक प्रेक्षणीय स्थळच होते. सुंदर इमारत, त्याच्या सभोवती रंगीबेरंगी फुलांची झाडे, पारंपरिक वेषात आपल्या स्वागतासाठी उभ्या असलेल्या युवती या सर्वांमुळे हॉटेल हे देखील प्रेक्षणीय स्थळ वाटेल इतके रमणीय आहे. आमचे जेवण चालू होते तेव्हा आमच्या मनोरंजनासाठी नाच गाण्याचा कार्यक्रम चालू होता. भारतातून एक चमू आलेला आहे याची संयोजकांना माहिती असल्याने हिन्दी सिनेमातील गाण्यावर एक नृत्य सादर करण्यात आले. चौकशीअंती असे कळले की भारतीय नृत्य तेथे पद्धतशीरपणे शिकविले जाते. सिनेमातील नृत्याबरोबरच कथ्थक, कुचिपुडी अशाही शास्त्रीय नृत्याचे धडे तेथे दिले जातात. चिनी मुले आणि मुली मोठ्या उत्साहाने भारतीय नृत्य शिकतात. दोन देशातील जनतेत खरोखरच भावनिक संबंध आहेत. तिचा आपण उपयोग करून घेतला पाहिजे.

**धगधगती टेकडी :**

''जेवण आटोपून लगेच परत या, आपल्याला दूरच्या प्रेक्षणीय स्थळाकडे जायचे आहे'' असे आमच्या गाईडने आम्हाला आधीच सांगितले होते. आम्ही परत येऊन आपापल्या जागेवर स्थानापन्न झालो तेव्हा आपण धगधगत्या टेकडीवर (Flaming Mountain) जाणार असल्याचे त्याने जाहीर केले. धगधगती टेकडी हे काय प्रेक्षणीय स्थळ आहे, असा प्रश्न आमच्या मनाला चाटून गेला. पण पाहू या काय नवीन आहे ते, असे म्हणून आमचे कुतूहल आम्ही दाबून ठेवले. आमची बस लवकरच गावाच्या बाहेर पडली. पुनश्च वाळवंट आणि दूरवर दिसणारी रेताळ टेकडी यावरून आम्हाला आपण कोठे जात आहोत याची कल्पना आली. लवकरच आम्ही आमच्या इच्छित स्थळी पोहोचलो. नुकतेच जेवण झाले होते आणि बाहेरची धग जाणवत होती. त्यामुळे



भुयारी संग्रहालयातील गौतम बुद्धाचे चित्र

आमच्यातील काही जणांनी वातानुकूलित बसमध्येच बसून राहणे पसंत केले. आम्ही मात्र उन्हाचा आणि उकाड्याचा आस्वाद घेण्यासाठी खाली उतरलो. जवळच एक उंच तापमापक लावलेले होते. ते पाण्याचे तापमापक असून त्यावेळचे तापमान ५४° से. असल्याचे दाखवीत होते. रखरखत्या उन्हात आम्हांला फार वेळ राहावे लागले नाही. कारण लवकरच आम्हांला भुयाराकडे जाणाऱ्या पायऱ्या दिसल्या. या पायऱ्यांनी आम्ही खाली गेलो तर तेथे जमिनीखाली एक प्रशस्त दालन आम्हांला दिसले. पृष्ठभागावर जरी मरणाचा उकाडा असला तरी जमिनीखाली या दालनात गारवा होता. संपूर्ण दालनात या परिसराची माहिती देणारे नकाशे होते. त्याचबरोबर त्यांच्या अनेक वीर पुरुषांचे पुतळे होते. या दालनाचा फेरफटका मारताना असह्य उकाड्याची जाणीवच होत नव्हती. बसमध्ये बसून राहिलेल्या इतरांनादेखील बोलावून आणावे अशी इच्छा मनात आली. पण ती इच्छा आम्ही मनातच दाबून टाकली.

जमिनीखालच्या आल्हाददायक वातावरणात आम्हांला फार वेळ राहता आले नाही. तेथे प्रदर्शित केलेल्या वस्तू पाहून आम्ही दुसऱ्या बाजूने बाहेर पडलो. या बाजूला धातूचे पुतळे उभारलेले आहेत. त्यात एक शिपाई आहे आणि बैलासारखा एक प्राणी आहे. या पुतळ्याशेजारी अनेक लहान लहान गाड्या उभ्या असलेल्या दिसल्या. या गाडीतून तेथील लोक पर्यटकांना फेरफटका मारायला नेतात. दुपारची वेळ असल्याने सर्वजण झाडाच्या सावलीत बसले होते. सकाळी किंवा संध्याकाळी यांना व्यवसाय मिळत असावा. गाड्यांचे आकार वेगवेगळे होते. अगदी एकाच व्यक्तीला बसता येईल एवढ्या लहान गाडीपासून तर ८-१० व्यक्ती बसू शकतील एवढ्या क्षमतेच्या मोठ्या गाड्या होत्या.

गाड्या ओढणाऱ्या प्राण्यांमध्येही विविधता आढळते. वाळवंटात गाडी ओढायची असल्याने उंट असणे क्रमप्राप्त होते. त्याखेरीज काही गाड्यांना घोडे जुंपलेले होते. सगळ्यात नजरेत भरणारी गोष्ट म्हणजे बोकडाची गाडी. बोकडाला गाडी ओढताना मी याआधी कधीच पाहिलेले नव्हते. चिनी लोकांनी बोकडाचा देखील गाडी ओढण्यासाठी उपयोग करून घेतलेला होता. अति उष्ण ठिकाणाचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करणे हीच अफलातून कल्पना आहे. वातावरणातील उकाडा असह्य होता. त्याचबरोबर समोरच्या रेताड डोंगरावरून परावर्तित



धगधगत्या टेकडीजवळील धातुचा पुतळा

होणाऱ्या प्रकाशामुळे डोळे दिपून जात होते. त्यामुळे तिथे जास्त वेळ राहणे अशक्य होते. म्हणून या ठिकाणची सहल आटोपती घेऊन आम्ही सर्वजण बसमध्ये येऊन बसलो.

तुर्पाण शहराच्या प्रेक्षणीय स्थळातील आजच्या शेवटच्या स्थळाकडे आम्ही कूच केले. हे स्थळ होते द्राक्षाचे मळे. तुर्पाण शहराच्या आजूबाजूला द्राक्षाचे अनेक मळे आहेत. द्राक्षांचा उपयोग करून मोठ्या प्रमाणावर वाईन तयार करण्यात येते. ही वाईन इथे तर वापरतातच, त्याचबरोबर युरोपमध्ये निर्यात करतात. वाईनसाठी लावलेल्या द्राक्षाची झाडे दाखविण्यासाठी आमच्या गाईडने आम्हाला या मळ्यात आणले होते. रस्त्याच्या दुतर्फा द्राक्षाच्या वेली लावून रस्त्यावर मंडप तयार करण्यात आला होता. या मांडवाच्या सावलीतून चालणे खूपच आल्हाददायक वाटत होते. विशेषत: धगधगत्या टेकडीचा अनुभव ताजा असल्याने हा अनुभव फारच सुखद वाटत होता. द्राक्षाची बाग एक सहलीचे ठिकाण म्हणून विकसित



**द्राक्षाच्या मळ्यातील सहल**

करण्यात आली होती. तेथे बसण्याची सोय होती, थंडगार पाणी पिण्याची सोय होती आणि खरेदी करायची असेल तर लहान लहान दुकाने होती. या दुकानांमध्ये चीनमधील अनेक वस्तू विक्रीला ठेवलेल्या होत्या. सर्वात जास्त संख्या होती ती मनुका विकणाऱ्या दुकानांची. द्राक्षाच्या बागेत यायचे आणि मनुका न घेता बाहेर पडायचे हे काही योग्य नाही. म्हणून आमच्यापैकी बऱ्याच जणांनी खरेदी केली.

**परतीची वाट :**

तुर्पाण शहरातील दिवसभराच्या सहलीत पाच प्रेक्षणीय स्थळांना आम्ही भेटी दिल्या. तोपर्यंत संध्याकाळ व्हायला आली होती. परतीच्या प्रवासाला आणखी तीन तास लागणार होते. म्हणून ही सहल आटोपून आम्ही परत निघालो. परत येताना आज काय काय पाहिले याची उजळणी करू लागलो. तेव्हा दीर्घकाळ स्मरणात राहतील अशा ठिकाणांना भेटी दिल्याचे लक्षात आले. एवढी सुंदर सहल आयोजित केल्याबद्दल आम्ही सर्वांनी आयोजकांचे आभार मानले. चांगल्या स्थितीतील रस्त्यामुळे आमचा संपूर्ण प्रवास सुखकर झाला होता. ज्यावेळेस या सुविधा नव्हत्या त्यावेळेस रेशीम पथावरून जाणारे व्यापारी आपल्या ओझ्यासह कसे प्रवास करीत असतील हा प्रश्न मात्र मला भेडसावत राहिला.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# निसर्गरम्य अंदमान - एक पवित्र तीर्थक्षेत्र

*दि. २८ मे. स्वातंत्र्यवीर सावरकरांची जयंती. या निमित्ताने आमच्याकडे आलेला दिशाचे हितचिंतक श्री. सुरेंद्र लागू यांचा लेख देत आहोत. प्रवासवर्णन असले, तरी तीर्थक्षेत्राचे त्यांनी केलेले वर्णन अतिशय वाचनीय आहे - संपादक*

२६ फेब्रुवारी. थोर क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा पुण्यस्मरण दिन. या दिवसाचे औचित्य साधून बारा दिवसांच्या अंदमान सहलीला जातोय! ''काळ्यापाण्यावर ना ! मग इथे काय वाईट आहे!'' एका मित्राने सहजपणे किंवा गंमतीने काढलेले देखील उद्गार असतील, पण क्षणभर मी अंतर्मुख झालो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या बासष्ट वर्षांच्या कालावधीनंतरही अंदमानची ओळख ''काळापाण्याचं बेट'', काळापाण्याच्या शिक्षेसाठी प्रसिद्ध असंच आहे. एकदा कैदी तिथे गेला म्हणजे मातृभूमीचे पुन:श्च दर्शन होणे केवळ अशक्यच. इंग्रजी सत्तेविरूद्ध उठाव करणाऱ्या, सशस्त्र क्रांती करणाऱ्या राजनैतिक कैद्यांना, क्रांतिकारकांना, देशभक्तांना कठोर शासन अथवा दंड देण्याच्या भावनेने ब्रिटिश प्रशासन अधिकारी अंदमान येथे पाठवीत असत. ज्या योगे अन्य क्रांतिकारक, ब्रिटिश राज्यसत्तेविरूद्ध उठाव करण्याची हिंमत करणार नाहीत. मात्र थोर क्रांतिकारी बाबा पृथ्वीसिंह आझादने अंदमान हा ''वीरांचे तीर्थस्थान'' नाव दिले आहे. तर क्रांतिकारी बाबाराव सावरकरांनी अंदमानला ''तीर्थांचे महातीर्थ'' म्हणून संबोधले आहे. राजकैद्यांचा क्रांतिकारकांचा होणारा अमानुष छळ, तेथील भौगोलिक परिस्थिती, भयानक कष्ट, यातना यांचं वर्णन वाचून, ऐकून अंगावर भीतीने शहारे उभे राहतात. म्हणूनच काही विद्वानांनी अंदमानला ''यातना शिबीर'' असेही म्हटले आहे. अंडाकृती बेट म्हणून ''अण्डमान - अंदमान'' असाही उल्लेख आढळतो.

पहिल्यांदा १७८९ साली ब्रिटिश सत्तेविरूद्ध बंड केलेल्या राजद्रोह्यांना, स्वातंत्र्यवीरांना कैदी म्हणून या द्विपावर सोडण्यात आले. त्यावर्षी तेथे दहा महिने सतत पाऊस पडत होता. सर्वत्र दलदल, चिखलाचं साम्राज्य होतं, मलेरिया, कॉलरा असे साथीचे रोग, अन्य रोगराई, जंगली आदिवासींची प्रचंड भीती या कैद्यांना मोठ्या प्रमाणात जाणवली. त्यात अनेक कैदी मेले. काही वेडे झाले. याचाच परिणाम अंदमान म्हणजे ''काळेपाणी'' असं समीकरण झालं. आज जगभरांतील लोकांसाठी ते ''उत्तम पर्यटन स्थळ'' झालेले आहे.




पर्यटक या बेट समूहाच्या सहलीसाठी येण्याचे तीन प्रमुख उद्देश म्हणजे - स्वातंत्र्यवीरांचे राष्ट्रीय स्मारक ''सेल्यूलर जेल'' बघणे, क्रांतिकारकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहणे, अश्मयुगीन आदिवासींना बघणे, त्यांच्या संस्कृतीची, जीवनपद्धतीची ओळख करून घेणे आणि तिसरे महत्त्वाचे म्हणजे विविधतेने, समृद्धतेने नटलेला निसर्ग

त्यामध्ये विविध रंगांची भरपूर समृद्ध कोरल्स, त्यामधील शेकडो रंगांचे मासे करीत असलेली क्रीडा, समुद्री जीवजंतू, डॉल्फीन, शार्क, मगर, हजारो माशांची पोहत असलेली फौज या बरोबरच या बेट समूहाची प्राकृतिक सुंदरता, हजारो वर्षांपूर्वीचे घनदाट जंगल, तिवरांची समुद्र तटीय वन संपत्ती स्वच्छ, सुंदर समुद्रकिनारे, शेकडो मैल प्रदूषणमुक्त बेटांच्या निर्मळ वातावरणाचा आनंद व अनुभव घेण्यासाठी तेथील खाद्य संस्कृतीचा आस्वाद घेण्यासाठी लाखोंच्या संख्येने निसर्गप्रेमी येथे येत असतात. या बेटांचा भव्य परिसर बघायचा असेल तर किमान वीस ते पंचवीस दिवसांचा कालावधी लागेल. तरीसुद्धा ती जुजबी ओळख असेल.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचं अलौकिक कार्यकर्तृत्व, प्रखर देशभक्ती, तीव्र बुद्धिमत्ता, चतुरस्र व्यक्तिमत्त्व, अफाट स्मरणशक्ती, प्रचंड व्यासंग, अमोघ वक्तृत्व, देशप्रेम या साऱ्यांविषयी शालेय जीवनापासून जे काही ऐकत होतो, वाचत होतो आणि चित्रपटाद्वारे जे पाहिलं, त्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाला ज्या ''सेल्यूलर जेल'' मध्ये अंधार कोठडीत डांबून ठेवलं होतं त्या पवित्र तीर्थस्थानाला भेट देण्याची अनेक दिवसांची इच्छा होती. त्या जेलविषयी थोडक्यात सांगायचे झाल्यास - राजनैतिक क्रांतिवीरांची संख्या जास्त असल्यामुळे इंग्रज सरकारने सेल्यूलर जेल निर्माण करण्याची योजना आखली. यासाठी २ सदस्यांची समिति बनविली गेली. या समितीचे सदस्य होते सर सी. जे. लायल व सर ए. एस्. लेथब्रीज यांनी १८९० ला पोर्टबलेअरचा दौरा केला आणि १३ सप्टेंबर १८९१ ला जेल बांधणीस सुरूवात झाली. १९०६ साली जेल बांधणीचे काम पूर्ण झाले. या जेलचे बांधकाम अतिशय कुशलतेने केलेले होते. ह्या जेलच्या कोठड्यांची बांधणी सायकलच्या आऱ्याप्रमाणे केलेली होती. सात दिशेकडे प्रत्येकी तीन मजले अशा सात इमारती होत्या व त्या एका दीपगृहासारख्या टॉवरशी एकत्र मिळत होत्या. ज्यामुळे एकच पहारेकरी सातही जेलच्या ६९८ कोठड्यांचे निरीक्षण करू शकत असे. सद्यस्थितीत आता फक्त ३ इमारती अस्तित्वात आहेत. प्रत्येक कोठडीला दोन कुलुपांची व्यवस्था होती व ह्या जेलचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, कोणताही कैदी दुसऱ्या कैद्याबरोबर संपर्क साधू शकत नसे आणि म्हणूनच त्याला सेल्यूलर जेल असे नाव दिलेले आहे.



प्रत्येक कोठडी १३॥ फूट लांब, ७ फूट रूंद, ९ फूट उंच आहे. प्रकाशासाठी अगदी उंचावर ३ फूट लांब व १ फूट रूंद अशी खिडकी आहे. ह्या जेलमध्येच वीर विनायक दामोदर सावरकर, गणेश उर्फ बाबाराव दामोदर सावरकर बंदी म्हणून सजा भोगत होते. सावरकरांना महाराजा बोटीवरून अंदमानला नेण्यात आले. 'माझी जन्मठेप' मध्ये स्वातंत्र्यवीरांनी लिहिल्याप्रमाणे (पृ. ४९) ह्या राजनैतिक बंद्यांना कठोर कारावास होता. कोल्हूस जूंपून तेल काढणे, नारळ सोलणे, काथ्या कूटून दोर वळणे आणि कामाचा कोटा पूर्ण न झाल्यास त्रिकोणी दंडीय फळीला लटकवून फटके मारणे. पायामध्ये लोखंडाच्या साखळ्या, हात बांधलेले, गळ्यात लोखंडाचा गोल त्यामध्ये लोखंडाची पट्टी त्यावर त्या कैद्याचा नंबर, जेलमध्ये आल्याची तारीख, मुक्ततेची तारीख आणि जेलचा एकूण कालावधी लिहिलेला

असे. कैद्याचा पोशाख हा ज्यूटचा असे.

कोल्हू - तेलाचा घाणा - घाण्याची दांडी, हाताने चाक फिरवतात तशी फिरवावयाची, खोबरे त्यात घातले की ही दांडी फिरवणे अतिशय जड जाई. वारंवार खाली बसावे लागे व शेवटी ग्लानी येऊन तो माणूस पडत असे. दहा वाजता नियमाप्रमाणे २ तास काम बंद ठेवावे असे होते. पण सतत कोलू फिरवूनही दिलेले तेल दिवसभरात निघत नसे. मग पुन्हा संध्याकाळी फटके व अन्य शिक्षा ठरलेली. कैद्यांना फक्त २ कटोरे पाणी ह्या काळात मिळत असे व दिवसाला ३० पौंड तेल काढावे लागत असे. (पृ. १९२) सकाळी, दुपारी, संध्यकाळी त्या वेळा व्यतिरिक्त शौचास जाणे म्हणजे अपराधच. संध्याकाळी ६ ते ७ च्या दरम्यान बंदी कोंडले जात ते सकाळी ६.०० वाजता कोठडीचे दार उघडण्यात येई. त्या अवधीत लघवीला फक्त एक मडके आणि ते मडकेही लधवीला पुरेल न पुरेल इतके लहान आणि अशात जर रात्री कोणास शौचास लागली तर मलाचा अवरोध करा, परवानगी मिळाली तर ठीक नाहीतर त्याच खोलीत मलविसर्जन केले जाई. मग त्या मलाशीच उसे करून रात्र काढावी लागे. सकाळी उठून त्या भंग्याची मनधरणी करावी लागे. नाहीतर आपल्या हाताने मळ काढून टाकावा लागत असे. ह्या व अशा प्रकारच्या कठीण कामांनी कित्येक कैद्यांना वेडही लागले होते.




कैद्यांना देण्यात येणारे अन्न हे अतिशय निकृष्ट दर्जाचे होते. त्यात अळ्या, गोम अथवा अन्य खराब धान्यही असे. कधी कधी त्या अन्नाला घासलेटचा वासही येत असे. पण सर्व निमूटपणे सहन करावे लागत असे. पण ह्या सर्व कैद्यांना आपल्या हक्काची जाणीव करून दिली ती बॅरिस्टर सावरकर यांनी. त्यांनी सर्व कैद्यांना एकत्रित येण्याचे म्हणजेच अेका विचाराने अेकत्रित येण्याचे आवाहन करून अन्न सत्याग्रह घडवून आणला. त्यामुळे काही प्रमाणात का होईना. अन्नाच्या दर्जात सुधारणा झाली. त्यांनी कैद्यांना लिहावयास वाचावयास शिकविले. कारण उदया जर तुमच्या सुटकेचा हुकूम आला तर तो तुम्हास वाचता आला पाहिजे यासाठी त्यांचा अट्टाहास होता, त्यांनी प्रत्येक कैद्याला भेट म्हणून यापुढे पुस्तकेच मागवा असे आवाहन केले व तुरुंगात वाचनालयाची पद्धत सुरू केली. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा बंदी क्रमांक होता ३२७७८ वर्ग सी ३ बंदीगृह क्रमांक २, शेवटचा माळा. त्याच कोठडीत सावरकरांनी आपली जन्मठेपेची शिक्षा भोगली. ही कोठडी पहाताना आपण नतमस्तक तर होतोच पण क्षणोक्षणी आपले डोळे पाणावतात. आजच्या ह्या स्वातंत्र्यासाठी ह्या राजबंदी



माणसाला अन्ना इतकीच श्रद्धेची गरज आहे.

लोकांनी किती हाल सोसले आहेत. हे पाहून मन तर खंतावतेच, पण एक गोष्ट तीव्रतेने जाणवते ती म्हणजे आजची तरुण पिढी अेकतर अतिशय संवेदनशील आहे नाहीतर टोकाची उथळ आहे. तेव्हा त्यांना ह्या आधुनिक तीर्थक्षेत्रांची माहिती करून देण्याची नितांत गरज आहे. सावरकरांच्या कोठडीत त्यांचे एक छायाचित्र लावलेले आहे. त्याला त्या दिवशी हार घातले होते व तसबीरी खाली फुलांची रांगोळी काढून त्या ठिकाणी मेणबत्या लावलेल्या होत्या. ह्याच कोठडीच्या भिंतीवर त्यांनी कमला हे काव्य लिहिले.

सावरकरांचा सुटकेचा हुकूम जेव्हा आला, तेव्हा जेलमधील कैद्यांनी त्यांना निरोप देण्याचे ठरविले पण हे सर्व जेलच्या नियमाविरूद्ध होते. तेव्हा दादू पाटील ह्या एका कैद्याने चाफ्याच्या ७ फुलांची माळ करून तो हार सावरकरांच्या गळ्यात घातला; कोणत्याही शिक्षेची पर्वा न करता. सावरकरांनी ती माळ मुंबईला आले तरी जिवापाड जपून आणली होती.

• • •

शेवटी ऐवढेच म्हणेन, दिव्यत्वाची जेथे प्रचीती तेथे कर माझे जुळती. येथील ध्वनी व प्रकाश कार्यक्रम बघताना आपण प्रत्यक्ष सेल्यूलर जेलच्या यातना भोगतो आहोत असं वाटतं. अंगावर शहारे येतात. क्रांतिवीरांनी स्वातंत्र्यप्राप्ती साठी किती कष्टमय जीवन भोगलेय. यातना सहन केल्या आहेत. याची कल्पना येते. साश्रु नयनांनी आपण तेथून बाहेर पडतो. ज्या स्वतंत्रतेचे आपण सुख भोगीत आहोत त्याचे खरे श्रेय ह्या महान राजबंद्यांना, क्रांतिवीरांना, देशभक्तांना आहे. तेथे आपण आपोआपच नतमस्तक होतो.

या द्वीप समूहाला अनेक मान्यवरांनी, विद्वानांनी ‘‘छोटा भारत’’ म्हणून संबोधल आहे. देशाच्या प्रत्येक प्रांतातील लोक येथे स्थायी - अस्थायी स्वरूपात वास्तव्यास आहेत. त्याशिवाय नर्मीज, नोपाळी, चिनी, भुतानी, बंगलादेशी हे लोकसुद्धा येथे दिसतात. अनेक जाती धर्मांचे लोक खेळीमेळीच्या वातावरणात गुण्या गोविंदाने राहत आहेत. धर्मावरून येथे झगडा झाल्याचे उदाहरण क्वचितच. विविध भाषा बोलणारे लोक असले तरी तेथील व्यवहाराची भाषा मात्र हिंदी आहे. यातून इतर राज्यांनी बोध घेतला पाहिजे. येथील सर्व लोकांचा धर्म एकच तो म्हणजे ‘‘मानव धर्म.’’

पोर्टब्लेअर ही अंदमानची राजधानी. कोरबायनसा बीच, नारळाच्या बागांनी वेढलेला समुद्र किनारा पोहण्यासाठी उत्तम आहे. वायपर आयलँड, नॉर्थने येथील कोरलरीफ, विविध प्रकारचे मासे, काचेचा तळ असलेल्या बोटीवर समुद्रप्राणी, हेवलॉक आयूलँड, आशियातील सर्वात जुनी व मोठी चारम येथील सॉमिल, फॉरेस्ट म्युझियम, मिनिझू, समुद्रिका म्युझियम आणि मार्केट हे सर्व बघण्यासारखं आहे.

बंगालच्या उपसागरातील अंदमान आणि निकोबार द्वीप समूह लहान मोठ्या अशा ५५६ बेटांचा असून ८२४९ चौरस कीलोमीटर परिसरात ते पसरलेले आहे. चेन्नई, कोलकत्ता, विशाखापट्टनम पासून पोर्टब्लेअर अंदाजे १२०० की. मी. अंतरावर आहे. समुद्री मार्गानी जाण्यास तीन दिवस तर हवाई मार्गानी दोन - अडीच तासात आपण पोर्टब्लेअर येथे पोहोचतो. ८६ टक्के भाग जंगलांनी व्यापलेला आहे. निकोबारला प्रवासी कंपन्या जात नसल्या तरी येत्या काही वर्षात ते देखील उत्तम पर्यटन स्थळ होईल याची खात्री आहे.

अंदमान स्थळ दर्शन करताना का कुणास ठाऊक, परंतु कोकणातील गुहागर, हेदवी, दिवेआगर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा सारख्या ठिकाणांची आठवण झाली. पर्यटन विकासाची अमर्याद क्षमता असलेला हा भूप्रदेश आहे. नितळ समुद्र किनारे, नागमोडी रस्ते, पाडे, पोफळीच्या बागा हे सर्व बघून मन प्रफुल्लित होई. या द्वीपाचं ८६% क्षेत्र घनदाट जंगलांनी व्यापलं आहे. या वनसंपत्तीमध्ये सागवान,

रबर, पाम, चुगलम, पडाक, लालचिनी अशा सारखी अंदाजे ६५० प्रकारांची झाडे आणि वनस्पती असल्याचा उल्लेख आढळतो. अजूनही बऱ्याच वनसंपत्तीची माहिती नाही. समुद्र संपत्तीचे वरदानही या बेटांना लाभलं आहे. विविध प्रकारचे मासे, तिवरे वनस्पती, मोती, शंख, शिंपले मोठ्या प्रमाणात येथे सापडतात.

या बेट समूहामध्ये पोर्टब्लेअर, रंगतनील, हॅवलॉक, बाराटांग, लाँग आईलँड, माया बंदर, दिगलीपूर, पिटील अंदमान निकोबार या आणि अशासारख्या बेटांवर जलमार्गाने, जमिनीमार्गाने जाता येते. अनेक ठिकाणी राहण्याची, भोजनाचीही चांगली सोय आहे. मात्र आधी बुकिंग करण जरुरीचं आहे. प्रदूषणरहित वातावरण, ट्रेकींग, हत्तीची सफारी, लैगून सहल, द्वीपकँपिंग, स्कूबाडायविंग, नौकाविहार या सर्वाचा आनंद आपल्याला घेता येतो. खरंतर लिहिण्यासारख, सांगण्यासारख बरंच आहे.

अंदमानला भेट देण्याचं तिसर महत्त्वाचं कारण म्हणजे अश्मयुगीन आदिवासींना बघणं. या बेटांवर सहा प्रकारचे आदिवासी शेकडो वर्षापासून जंगलात रहात आहेत. जवळपास पंचवीस - तीस हजारांची त्यांची लोकसंख्या आहे. जरावा, सेन्टीनलिज जातीचे आदिवासी एकविसाव्या शतकात देखील नग्नावस्थेत राहतात. मात्र अन्दमानीज, ओंगी, निकोबारी, केरेन, शोम्पेने आदिवासी आधुनिक सभ्यतेच्या जवळ येत आहेत. तरी सुद्धा जंगलात राहणं ते पसंत करतात. काही जमातीमधील लोक बऱ्याच प्रमाणात शिक्षित असून नोकरी, व्यवसाय, क्रीडाक्षेत्रात आहेत. या लोकांचं मुख्य जेवण म्हणजे मासळी, डुक्कर, केवडी, मध, जंगली कंदमुळे हेच आहे. भारत सरकार त्यांच्या विकासासाठी उज्ज्वल भवितव्यासाठी करोडो रूपये खर्च करते ही आनंदाची गोष्ट आहे. रंगाने चमकदार काळे, उंचीने ठेंगणे, नाकाने चपटे, जाड ओठ, कुरळे राठ केस, मजबूत शरीरयष्टी असं त्यांच बाह्य वर्णन करता येईल. शिकार करून आपली उपजिविका करतात. सभ्य सुशिक्षित, सुसंस्कृत माणसांनी त्यांना बराच त्रास दिला असल्यामुळे त्यांच्या विषयी बदल्याची भावना त्यांच्या मनात आहे. त्यांची छायाचित्रे घेणे त्यांना आवडत नाही. स्वाभिमानी जीवन जगण ते पसंत करतात. आपले खाद्य पदार्थ त्यांच्या प्रकृतीला मानवत नाहीत यास्तव ते देण्याचे आपण टाळावे. मात्र एकविसाव्या शतकात देखील अशी लोक आपल्या देशात राहतात हे बघून आपण अंर्तमुख होतो.

२६ डिसेंबर २००४ च्या त्सुनामीमध्ये प्रचंड प्रमाणात जिवित, वित्त, क्षेत्रीय, जंगल संपत्ती इत्यादींची हानी झाली. २० ते ३० मीटर उंचीची लाट २०० ते ७०० कि. मी. प्रतितास वेगाने किनाऱ्यावर आदळत होती. निकोबार बेट समूहाचे प्रचंड नुकसान झाले. त्या मानाने अंदमान बेटाची हानी कमी प्रमाणात झाली.

या बेट समूहाचा विकास आणि प्रगती निश्चितच सुरू आहे. परंतु त्याला अपेक्षित वेग नाही. ऐतिहासिक दृष्ट्या या बेटाचं महत्त्व तर आहेच; परंतु भौगोलिक, प्राकृतिक आणि आरमाराच्या (नौदलाच्या) दृष्टीनेही ही बेटे मोक्याच्या ठिकाणी आहेत. सध्या या संपूर्ण द्वीप समूहांना मोठ्या जनरेटरद्वारा वीज पुरवठा केला जातो. त्याचा खर्च प्रचंड प्रमाणात आहे. रेल्वेही नाही. परंतु कोण जाणे भविष्यात या दोन्ही सेवा उपलब्ध होऊ शकतील त्यादृष्टीने शासनाचे प्रयत्नही चालू आहेत. या बेट समूहाशी, तिथल्या संस्कृतीशी तेथील जनतेशी मित्रत्वाचं, सलोख्याचे आणि आपुलकीचे स्नेहसंबंध निर्माण करणं आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. त्यांचा विकास, त्यांची समृद्धता आणि प्रगती म्हणजे पर्यायाने आपलीच प्रगती आहे हे विसरून चालणार नाही. बेट समूहांची सुरक्षितता, त्यांच संरक्षण आणि काळजी घेणं हे भारतीय म्हणून आपल कर्तव्य आहे.

**श्री. सुरेंद्र लागू**
२ / पहिला मजला, यमुना सोसायटी, गोविंद बच्चाजी रोड, चरई, ठाणे (प.) दूरध्वनी - २५३४९३४१

●●●

आवश्यक तेवढेच बोलावे.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*देवशिल्प व मानुषशिल्प या संकल्पनांचा विचार मांडणारा लेख - संपादक*

**प्रास्ताविक :**

'दिशा' च्या फेब्रुवारी व मार्च २००९ च्या अंकात आपण रवीन्द्रनाथ टागोर यांच्या 'संस्कृती' ह्या शब्दात व्यक्त होणाऱ्या संकल्पनेची व डॉ. निहार रंजन राय यांच्या 'कृष्टि' ह्या शब्दातून व्यक्त होणाऱ्या संकल्पनेची छोटीशी तुलना बघितली.

अगदी थोडक्यात, ढोबळ पद्धतीने बघितल्यास डॉ. राय यांचे म्हणणे भारतीय संस्कृतीच्या 'वेद बीजाशी' जास्त जवळचे व त्यामुळेच यथार्थ होय, असे मला वाटते.

याचे कारण, पुन्हा पाश्चात्य जडवादी संस्कृती व भारतीय 'स्पिरीच्यूअल' किंवा वेदिक बीजावर आधारलेली मानवी संस्कृती, ह्या मधील मूलभूत फरकावर आधारलेल्या, दोन संकल्पनेतील, फरकांवर विषद करता येते. हा फार महत्त्वाचा मूलभूत फरक आहे व तो पूर्णपणे जाणण्याचा प्रयत्न आवश्यक आहे, असे मला मनोमन वाटते. हा फरक दाखवताना डॉ. निहार रंजन राय आणखी दोन संकल्पना मधील सूक्ष्म फरकाकडे लक्ष वेधतात.

त्या दोन संकल्पना म्हणजे **'देवशिल्प' व 'मानुषशिल्प'** ह्या ' शिल्पकृती' व निर्मीतीमधील मूलभूत फरक.

**कुल व शील म्हणजे काय? :**

आणि, नंतर ते संस्कृतीमधील ''**शील**'' व ''**कुल**'' ह्या दोन महत्त्वाच्या घटकांबदलचा फरक दाखवतात.

**ह्या दोन्ही गटांच्या संकल्पनेतील मौलिक अंतर जाणण्यासाठी भौतिकवादी व अध्यात्मवादी दृष्टिकोनातील फरकाची जाण अत्यंत आवश्यक आहे. ह्या तऱ्हेने संकल्पनाचे मूल्य जाणणे, ही पद्धत अंगीकारणे नवीन आहे.**

अजंठा व वेरूळ किंवा खजुराहो यामधील नर्तकीची दगडातील व्यक्त केलेली शिल्पकृती ही **'मानूषशिल्प कृती'** आहे. हे उघडच आहे. पण, त्यासाठी दगड, हत्यारे ही सामग्री व **शिल्पशास्त्रज्ञाचीही (मानवी) सौंदर्य दृष्टी** ही आधारभूत आहे. हे निर्विवाद आहे.

**पण, ही सौंदर्य दृष्टी कुठून पैदा होते? हे दगड, डोंगर व लोखंडी हत्यारे कोण ही सामुग्री पुरवतो?**

**एव्हढेंच नव्हे तर, ह्या सुंदर शिल्पाची प्रशंसा व समुत्पन्न अभिरुची असणारा मानवी समाज कोणत्या वैश्विक निर्मिती क्रमाच्या सातत्याने, अनंततत्वाने ह्या पृथ्वीवर जन्म घेत रहातो? हे प्रश्न पडावयाला हवेत, नाही कां?**

शिवाय, **शेवटचा 'भीमटोला'** तर हा आहे की हा शिल्पशास्त्रज्ञ सुद्धा कुठल्या निर्मिती प्रक्रियेने व कुणाच्या इच्छेने ह्या पृथ्वीवर जन्माला आला?

**सध्याचे विज्ञानशास्त्रज्ञ व 'विज्ञान प्रवृत्ती' ''Scientific Temper'' ह्या मौलिक प्रश्नांना काळाच्या खुंटीवर (अडगळीत) टाकून देत आहेत.** भविष्यात त्याचा काय निकाल लागायचा तो लागो, ही त्यांची सध्याची 'प्रामाणिक' धारणा आहे. पण, ह्या उलट मात्र थोड्या उथळपणे व फाजील बेजबाबदार उत्साहाने ते सध्याच्या

राजकीय, सामाजिक, भौतिकवादी उद्दिष्टांना व त्यांतील संघर्षांना मात्र हातभार लावण्यास तयार आहेत. **एव्हढेच नव्हे तर त्यांची "Research विषय' संशोधनाची यादी ही 'मानवी संहारक अस्त्रे व शस्त्रे' निर्माण करण्यास बांधलेली आहे.** तिथे Reward and Payment चांगली आहेत!! हे शास्त्रज्ञ नैतिकतेची कुठलीही जबाबदारी पेलावयाला तत्पर नाहीत.

हा टीकेचा भाग डावलून चालणार नाही, कारण **खऱ्या 'शोधप्रवृत्ती'** पासून **घसरलेला हा शास्त्रीय प्रवृत्ती मार्ग आहे व त्यावरील टीका ही सोयीस्करपणे डावलली जाते.** समाजाचा दोष सुद्धा ह्या प्रवृत्तींचा जाब न विचारण्याकडे जाण्याचा आहे. ह्या शोधांसाठी होणारा मानवी शक्ती व सामग्री व अर्थसहाय्याचा अपव्यय, आता न झेपणाऱ्या अवस्थेपर्यंत जाऊन पोचला आहे.

त्यामुळे, **भारतीय संस्कृतीतील 'कुलशील'** ह्या संकल्पनेचाही विचार अत्यंत आवश्यक ठरावा. संस्कृतीतील कुल व शील ह्यांचा उगम व अंतर्भाव व प्रसार कोणत्या तत्त्वांवर व पद्धतीने होतो, त्याची अत्यंत मूलभूत चर्चा डॉ. निहार रंजन राय हे त्यांच्या लेखात करतात.

आश्चर्य हे आहे की ह्यासाठी त्यांना ह्या **संकल्पनांचा 'झरा' कुठे आढळला?**

पुनरावृत्तीचा अपराध पत्करूनही मला तो 'मूळ स्त्रोत' जास्त विस्ताराने सांगण्याचा मोह आवरता येत नाही.

**हा उतारा आहे ऐतरेय ब्राह्मणात. आपल्या ''Oriental Institute of Studies'' ह्या शाहू मार्केट, नौपाडा, ठाणे ह्या संस्थेच्या वाचनालयात क्रमांक न. - ३२७१ पान नं. २४८ ह्या ठिकाणी ह्या 'ब्राह्मणाचे' श्री. गो. वि. विद्वांस यांनी केलेले भाषांतर उपलब्ध आहे.**

**''ॐ शिल्पनि शंसान्ति देव शिल्पानि।**

**एतेषां वै देव शिल्पानाम् अनुकृतीह शिल्पम् अधिगम्यते।**

**हस्ती कंसो वासो हिरण्यम् अश्वतरीरथः शिल्पम्...।**

**आत्म संस्कृतीर्वाव शिल्पानि।**

**छंन्दोमयं वा एतैर्यजमान आत्मानं संस्कुरूते।''**

**प्रजनन क्रिया व प्रसूती गृह :**

दिशाचे संपादक, आमचे परम मित्र व अत्यंत जाज्वल्य ज्ञानपिपासू व ज्ञानसंस्था चालवणारे डॉ. विजय बेडेकर आहेत. 'ओरिएन्टल इस्टिट्यूट ऑफ स्टडीज'' ह्या ठाण्यातील एका विलक्षण ग्रंथ संग्रहालयाचेही अध्यक्ष आहेत. तेव्हा त्यांना परिचित असलेल्या ज्ञान समूहाविषयी काहीही कमतरता किंवा अडचण वा शंका यावयाला वाव नाही.

पण, डॉ. विजय बेडेकर एक 'प्रसूतिगृह' पण चालवतात. ठाण्यात इतर मॅटर्निटी हॉस्पिटलेही आहेत. मग काय आहे ह्यांचा संदर्भ देण्याचा आग्रह? प्रसूतिगृहाचा काय संदर्भ? 'देवशिल्प' म्हणजे 'नवीन मानवी जीव' त्याच्या एका जादूच्या देहाबरोबर निर्माण होतो.

हा माझा आग्रह नाही तर डॉ. निहार रंजन राय यांचा अप्रत्यक्षपणे आहे. काय म्हणतात ते प्रत्यक्ष पाहू या!!

**''ध्यान देने योग्य है कि इसके बाद भी अंन्तिम वाक्य में 'सन्तान प्रजनन' की क्रिया को भी शिल्प-कर्म कहा गया है। जो अन्योन्य शिल्प की तरह ही छन्दोन्मय होने के नाते आत्मसंस्कार का अन्यतम उपाय है, इस सन्दर्भ में उद्धृत अनुच्छेद की व्याख्या करते समय अनेक विव्दान ही इस बात का भूल जाते है, अन्ततः उस बात पर जोर देना नही चाहते।**

**प्रजनन क्रिया प्रकृति के छन्द एवं देव शिल्प के नियम मे बँधी है ...।**

**आगम ५ अग्निहोत्रे :**

'प्रजनन क्रिया' कुठे, केव्हा व कशी होते? छांदोग्य उपनिषदात वर्णिलेली ही क्रिया ५ अग्निहोत्रांनी होते. त्यातील दोन शेवटची अग्निहोत्रे म्हणजे स्त्री-पुरुष संभोग क्रिया व शेवटची प्रत्यक्ष स्त्रीची प्रसृती. ह्या नंतर भारतीय संस्कृतीत काही संस्कार क्रिया सांगितल्या आहेत. पण विस्मृतीत गेल्या आहेत!!

हे सर्व सांगण्याचे प्रयोजन काय असा प्रश्न पडेल. पण, संस्कृती मध्ये जी उच्च जीवनमूल्ये, सौंदर्यमूल्ये, नीतीमूल्ये, व्यक्तिगत व सामाजिक एव्हढेच नव्हे तर मानवी समाज व इतर जीवसृष्टी व वनस्पती सृष्टी ह्यांच्या परस्पर नात्यांबद्दल प्रेम संबंधाबद्दलही अशी मनोहर मूल्ये निर्माण होतात, ती कशी होतात, ह्याचा आपल्याला नीटसा परिचय नाही. खरेतर, निरनिराळ्या मानवी संस्कृत्यांचा उगम व प्रसार जो ह्या पृथ्वीने पाहिला त्यांचे <u>'ह्या दृष्टीकोनातून'</u> काही फारसे मौलिक संशोधन आणि तुलना केल्याचे वा झाल्याचे, माझ्यातरी वाचनात नाही.

पण, डॉ. निहार रंजन राय या गूढ पण महत्त्वाच्या प्रश्नावर काही जोरकस मौलिक विचार मांडत आहेत तिकडे मी नक्कीच लक्ष खेंचू इच्छितो.

मी डॉ. राय यांच्या निबंधाचा विचार दिशाच्या जानेवारी २००९ ह्या अंकापासून सुरू केला. त्यानंतर मे २००९ चा अंक हा त्यातला ५ वा भाग होय!!

'कृष्टि, संस्कृति व कल्चर' ह्या वरवर सारख्याच संकल्पना आहेत असे वाटेल. ह्या शब्दांचे सूक्ष्म फरक दिसण्याचे खुद्द शब्दांना सामर्थ्य नाही. त्यामुळे हा वाद ते रविन्द्रनाथ टागोरांपासून सुरवात करतात. तेव्हा त्याची तेव्हढ्याच गंभीरपणे व चिकीत्सेने दखल घेणे अत्यावश्यक आहे असे जाणवेल. संस्कृती व 'कल्चर' (पाश्चात्य संकल्पना) ह्यामध्ये तसा फारसा फरक नाही. पण, 'कृष्टि' ह्या पूर्णपणे भारतीय शब्दामागे जी एक वेदाच्या ज्ञानाची बैठक आहे, ती त्यांनी 'ऐतरेय ब्राह्मणाच्या' एका उताऱ्यावरून शोधून व मांडून आपल्यावर फार मोठे उपकार केले आहेत, असे मला आग्रहाने म्हणावयाचे आहे!!

त्याही पुढे जाऊन '<u>कुलशील</u>' ह्या दोन शब्दांच्या मागे ज्या गूढ संकल्पना बांधलेल्या आहेत. त्या सांगण्यासाठी केलेला प्रयास हा त्यांच्या लेखाचा महत्त्वाचा उद्देश आहे, तो आपण जाणून घेणे सुद्धा अत्यावश्यक आहे.

संस्कृतीच्या जडण घडणीत दैवी हात किती व मानवी समाजाचा हातभार किती व त्यांत मौलिक फरक कोणता, ही गोष्ट ते सांगताहेत.

संस्कृतीचा प्रवाह सातत्याने मानवी समाजाच्या जीवन प्रवाहात पिढ्यान्‌पिढ्या चालत रहातो, त्याचा एक आधार तर उघडच नवीन जीवांचा जन्म एका नैसर्गिक किंवा वैश्विक निर्मीती शक्तीच्या नियमानुसार होणाऱ्या ''प्रजनन'' क्रियेमध्ये सुरक्षितपणे सामावलेला आहे. ही एक Sexual, Biological, Animotistic क्रिया आहे असे म्हणून व तिच्या काही दर्शनी विभागामध्ये माहिती मिळवून तिचे गूढ उकलले व आणखी काही गूढ शिल्लक राहिले नाही, असा **यांत्रिक वैज्ञानिक निष्कर्ष** काढून गप्प बसून चालणार नाही.

**<u>ह्या प्रजनन क्रियेत 'संस्कृती व संस्काराची' पूर्वीच्या मानवी समाजाने मिळवलेली मूल्ये पुढच्या पिढींमध्ये प्रवाहीत, कां होतात असा प्रश्न पडावयाला हवा.</u>** Genetics मध्ये काही तुटपुंज्या प्रश्नांबाबत जे संशोधन चालू आहे, त्यावर समाधान बाळगून चालणार नाही. खरेतर ही संशोधने अतिशय उथळ व बाजारी, व्यवहारी दिशेमध्ये आणि खऱ्या मूल्याधिष्ठित प्रश्नांच्याकडे पाठ फिरवून व दिशा हरवलेल्या मार्गाने वहावत चालली आहेत. त्या संशोधनाचा हेतू, संस्कृती मूल्ये शोधणे व संस्कारित प्रवृत्तींची वृद्धी करणे, असा बिलकूल नाही.

त्यामुळे ह्या प्रजनन क्रियेमध्ये जरी नवीन जीवांचे व मानवी जीवात्म्यांचे नियमीतपणे आगमन होत असले व त्याच्या निरंतर सातत्याची फसवी खात्री असली तरी खरा प्रश्न पुढचाच आहे. जीवनाच्या सातत्याचा जो फॉर्म्यूला वैश्विक अव्यक्त जगांत कार्यरत आहे, त्याची माहिती पूर्णत्वाने नाही.

ह्या कुठल्याही व विशेषत: 'भारतीय संस्कृतीमध्ये ज्या 'कूल व शील' ह्या वैशिष्ट्यांचा निर्देश होतो व आढळतो त्याचा प्रवाह, ह्या जीवन मरणाच्या संसाराच्या फेऱ्यामध्ये कशा तऱ्हेने संभाळला जातो - किंवा, संभाळला जाण्याच्या कोणत्या योजना दिसतात, हा प्रश्न आहे!!

**पुन्हा, हा प्रश्न, संस्कृतीकडे एका शास्त्रीय दृष्टीने पहाण्याचा भाग ठरावा.** गंमत ही आहे की **अशा तऱ्हेने ह्या देशांत तो बधितला गेला होता, याचा इतिहास आहे व त्याचे संपूर्ण शास्त्रसुद्धा ज्ञात झाले होते. हे आजच्या सर्व सामाजिक स्मृतीमध्ये नाही. त्याचा पुनर्शोध आवश्यक ठरावा.**

हाच पुन:र्शोध डॉ. निहार रंजन राय ह्यांनी लावलेला आहे. दुर्दैवाने त्यांच्या ह्या शोधाकडे ज्या उत्सुकतेने व आदराने सगळ्या जगाने बघावयाला हवे तसे बिलकूल घडत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे.

हा शोध भारतीय संस्कृतीमध्येच लागण्याचा काय योगायोग आहे?

**हा योगायोग आहे काय? :**

तर, हा योगायोग नाही. भारतीय संस्कृती ज्या चिरंतन तत्वांवर बांधली जाते, त्या यंत्रणेची पूर्ण माहिती व ज्ञान ज्या एका अज्ञात युगांत मानवाला किंवा ऋषीमुनींना प्राप्त झाले होते. तो काळ वा ते युग इतक्या अंतरावर भूतकाळात अस्तित्वात होते की त्याबद्दलचे ज्ञान व संदर्भ आपल्याला केवळ वेद, ब्राह्मणे व पुराणे यांच्या मार्फतच प्राप्त होण्याची संधी व शक्यता आहे. पण, ह्या शोध घ्यावयाच्या मार्गावर सध्याच्या जगाची काय किंवा भारतीय समाजाची पण श्रद्धा नाही. आणि, म्हणूनच डॉ. निहार रंजन राय यांना त्याचा संदर्भ व पुरावा **'ऐतरेय ब्राह्मणांत'** मिळाला.

या विचाराला आणखी एक संदर्भ आहे. त्यांनी ज्या एका प्रश्नावर आपले ध्यान खेचले आहे, तो मोठा उपकार आहे. ''कूल व शील'' यांचे दर्शन व संदर्भ आजच्या जीवनांत आपल्याला दिसतील - व्यक्त स्थितीत दिसतील, पण ज्या 'तत्वांवर' त्यांची निर्मीती, संवर्धन व वृद्धी व परिपोष होतो त्यांचे **स्थान अव्यक्त जगातच** आहे.

ह्या व्यक्त व अव्यक्त जगातील नाते हे एखाद्या वृक्षाच्या भूमीखालील बीज व भूमीवरील पाने, फुले, फळे यासारखे अजोड व दृश्य अदृश्य नात्यांसारखे आहे.

**हे गूढ फक्त भारतीय वेदिक ज्ञान मार्गातच समजू शकते व प्राप्त होऊ शकते. इतर संस्कृतींना हा वारसा नाही.** आणि तो थोडासा पुसटसा दिसल्यास, तो सुद्धा इथूनच ह्या भूमीवरूनच संक्रमित झाला असण्याची दाट शक्यता आहे. कारण ज्या पूर्णत्वाने व ज्या सामंजस्याने त्याचे ज्ञान इथे सांपडते ते जगात इतरत्र कुठेही आढळत नाही.

**आपण स्वामी दयानंद (आर्य समाज संस्थापक) यांनी १६ संस्कार क्रिया (गर्भाधान ते अंत्येष्टि) ह्यांचे पुनरूज्जीवन करण्याचा जो प्रयत्न केला, त्याचे वर्णन दिशाच्या मागील काही अंकात पाहिले. त्या क्रियामध्ये 'वैश्विक ऋग्वेद वर्णित अग्नि' ह्याचाही कार्यभाग जाणला.**

त्यामुळे जन्मगत संस्कार, जे नवीन जीवात्म्याला त्याच्या पृथ्वीवरील योनी जन्म क्रियेने प्राप्त होतात त्यांत पूर्वाश्रमीचे 'कुल व शील' ह्यांच्या '**अवगत गुणात्मक प्रवृत्ती**', 'अनुवंशिक वारसा' या न्यायाने प्राप्त होत असतील!! कदाचित, त्या स्पष्टपणे जाणवल्या नाहीत, तरी

सुप्तपणे त्याच्या शरीरांत असतात असे मानावयाला हरकत नाही.

पण, **त्यामधील 'कुल' ह्या जैविक म्हणजे 'Biological' पद्धतीत एक 'उत्तराधिकार' म्हणजे devolution ही क्रिया आहे.** पण, डॉ. निहार रंजन राय ह्यांच्या दर्शनामध्ये ते काय म्हणतात ते पहा.

**''कुल' स्थिर पदार्थ है; इसलिए कुल, अतीत है; उत्तराधिकार, गतिहीन, निष्क्रिय है, इसलिए उसके भीतर जीवन सक्रिय नहीं।''**

उलट 'शील' ह्या संकल्पनेत ते फरक करतात. **''किन्तु शील कभी स्थिर रूप में नही रहता। क्योंकि प्रत्येक कालके, एवं प्रत्येक वंशानुक्रम के आकार - प्रकार, प्रश्न एवं प्रयोजन तथा समस्या एवं समाधान अलग - अलग है।**

**एक पिढी का शील दूसरी पिढी का शील नही हो सकता, क्योंकि प्रत्येक व्यक्ति को स्वयं शील का निर्माण करना पडतो है।**

**शील को कोई उत्तराधिकार के सूत्रो से प्राप्त नही कर सकता.''**

**हे विधान अत्यंत महत्त्वाचे आहे.**

एका काळातील समाजपरिस्थितीत जे 'शीलांचे एक दिव्य स्वरूप सर्वसामान्य व्यक्ति ने प्राप्त केले, ते त्याच्या वंशजाना वंशपरंपरेने, पण एक ''Cultural Inheritance'' 'सांस्कृतिक वारसा' म्हणून जरूर प्राप्त होईल, पण त्याला जी स्वयंभू गती आहे, त्या शक्तीमुळे त्या शीलाचे स्वरूप त्या त्या प्राप्त काळाच्या समस्या, अनुभूती व सामाजिक जीवनपद्धतीमध्ये बदलण्याची व शील मूल्यांचे नूतन परिवर्तित रूपांतर होण्याची आवश्यकता असते. तशी ती होणे ह्यालाच ''**Tradition and change**'' ''**परंपरा व बदल**'' - ''**युगानुकूल बदल**'' असे म्हणता येईल. **ह्या 'शब्दप्रयोग' पंडीत दीन दयाल प्रभू यांनी** त्यांच्या **''एकात्म मानव दर्शन'' ह्या** सिद्धांतातही मांडला आहे.

त्यामुळे महत्त्वाचा मुद्दा जो डॉ. राय उपस्थित करत आहेत, तो साध्या शब्दात असा की, संस्कृतीच्या काळाच्या वाटचालीत वंशपरंपरा न्यायाने काही मूल्याची समज, जन्मत: त्या त्या समाजांत जन्म घेणाऱ्या, त्या त्या भूगोलातील विशिष्ट भूमीवरील समाजाला प्राप्त होऊं शकेल, पण 'शील' ही गोष्ट मात्र या कुल नियमांच्या बाहेरची चीज आहे. ती प्रत्येक समाजाला आपल्या संस्कृतीच्या मूळ बीजाला अनुसरून व अनुरूप अशी जतन करण्याची जबाबदारी पडते. अर्थातच, काळाच्या अनंतातील प्रवासात ह्या शीलाच्या बाह्य स्वरूपामध्ये कांही **युगानुकूल बदल** करणे आवश्यक ठरते.

**तसे बदल करण्याचे सामर्थ्य व कृती ही त्या संस्कृतीच्या 'आचार्य, ऋषी, मुनीची आहे** व त्या त्या समाजाची धारणा ह्या सर्व बदलाला, संवर्धनाला अनुकूल करण्याची **जबाबदारी ही त्या त्या वेळच्या समाजिक पुढारी, राज्यसत्ता, शैक्षणिक संस्था व त्याला पूरक अशा शासनाच्या सर्व घटकांची असावयाला लागते.**

मग, पाश्चात्य भौतिकवादी व भारतीय अध्यात्मवादी सामाजिक संस्कृतीमधील ज्ञान व जाणीव यामधील **फरक कोणता?**

तर पाश्चात्य समाज शास्त्रज्ञांना 'कुल व शील' ह्या दोन संकल्पनातील फरक स्पष्टपणे ज्ञात नाही. त्यांच्या सामाजिक पुढारी व तत्वज्ञ यांची धडपड केविलवाणी आहे. त्यांना हा संकल्पनेचे मूळ बीज व प्रेरणा व शास्त्र अवगत नाही. तसेच ह्या संकल्पनेतील 'विश्वधर्म' ह्याचे नियम व प्रभाव यांचीही सुतराम जाणीव नाही. कारण उघड आहे. सेक्यूलर व भौतिकवादी दृष्टीकोनामध्ये एकांगीपणे ते या सर्व परिवर्तनाचे सूत्र फक्त मर्त्य मानवी समाजातच शोधतात.

<u>त्यांच्या दृष्टीने, प्रत्येक मानवी जीव हा एक अंतर्मनात दैवी सूत्र व प्रेरणा, पूर्व जन्मीच्या स्मृती व वैश्विक उत्क्रांती तत्वाची धारणा घेऊनच जन्मतो व वावरतो, हे त्यांना मान्य नाही.</u>

मग, भारतीय संस्कृतीमध्ये या गोष्टींची पुरती जाणीव आहे - असावयाला हवी, ह्यांत वाद रहणार नाही.

आता हा उत्क्रांतिचा व भारतीय संस्कृतीला उंच दैवी सात्विक ध्रुवताऱ्याकडे नेण्याचा कार्यक्रम कुल, शील, कला, साहित्य, जीवनपद्धती व संस्कार क्रिया यांनी कसा राबविला जातो, ते आपण दिशाच्या पुढील अंकात जाणून घेऊ या.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी, अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
E mail;: yrsane@eth.net

●●●

**१ मे. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राबद्दल**

**महाराष्ट्र - भौगोलिक**

| | | |
|---|---|---|
| अक्षवृत्त | - | १५°.८' ते २२°.१' उत्तर |
| रेखावृत्त | - | ७२°.६' ते ८°.९' पूर्व |
| स्थापना | - | १ ते १९६० |
| राजधानी | - | मुंबई |

**राज्याच्या सीमा :**

पश्चिमेस अरबी समुद्र, वायव्येस दादरा व नगर हवेली या प्रदेशांची हद्द, वायव्येस गुजरात राज्याची सीमा, उत्तरेस, ईशान्येस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, आग्नेयेस आंध्र प्रदेश व दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा.

**राज्याचे एकूण क्षेत्रफळ :**

३,०७,६९० चौ. कि. मी. किनारपट्टीची लांबी ७२० कि. मी. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ असे चार विभाग पडतात. राज्यात एकूण ३५ जिल्हे व ३५४ तालुके आहेत. वस्ती असलेली खेडी ४३,७२२.

**राज्याची प्राकृतिक रचना :**

१) कोकण किनारपट्टी - चिंचोळा किनारपट्टीचा प्रदेश. रूंदी सामान्यत: ५२ ते ६० कि.मी. उल्हास नदी खोऱ्यात रूंदी वाढते. ती साधारणपणे १०० कि. मी. पर्यंत आहे. किनाऱ्याला लागून प्रदेश सखल आहे. पूर्वेकडे डोंगराळ होत जातो.

२) सह्याद्री पर्वत प्रदेश - ही पर्वत रांग किनाऱ्याला समांतर व सलग आहे. सह्याद्रीची महाराष्ट्रात सरासरी उंची ९०० मी. आहे. कळसूबाई (१,६४६ मी.) सर्वात उंच शिखर आहे. उत्तरेकडून अनुक्रमे सात माळाचे डोंगर, अजिंठ्याचे डोंगर, हरिश्चंद्र डोंगर व महादेवाचे डोंगर याप्रमाणे.

३) पूर्वेकडील पठारी प्रदेश - सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडील प्रदेश. याच्या पूर्वेकडे बंगालच्या उपसागराच्या दिशेने उतार. उत्तरेकडे सातपुडा पर्वत, तापी खोरे, अजिंठ्याचे डोंगर, गोदावरी खोरे, हरिश्चंद्र रांगा, भीमा खोरे, महादेवाचे डोंगर व कृष्णा खोरे याप्रमाणे पठारी भाग हा डोंगर गंगा व नद्यांची खोरी यांनी व्यापलेला आहे. पश्चिमेकडे प्रदेशाची समुद्रसपाटीपासून उंची सरासरी ६०० मी. आहे.

४) सातपुडा पर्वतरांग व तापी खोरे - सातपुडा पर्वतरांग महाराष्ट्राच्या उत्तर सीमेला लागून आहे. पर्वताच्या दक्षिणेकडे तापी नदी खोरे आहे.

# संगीत संन्यस्त ज्वालामुखी

*संगीत संन्यस्त ज्वालामुखी हे स्वामी विवेकानंदांच्या जीवनावरील नाटक पाहिल्यानंतर श्रीमती आशाताई भिडे यांच्या मनात आलेल्या विचारांची ही अभिव्यक्ती - संपादक*

प्रेक्षक येत नाहीत याला नाटकच जबाबदार! ज्येष्ठ रंगकर्मी विजया मेहतांची स्पष्टोक्ती. हा लेख वाचला नि नुकतंच पाहिलेल्या (एकदा नव्हे तीनदा) ज्या नाटकाने ४० तासात सलग ११ प्रयोग करण्याचा विश्वविक्रम नुकताच ठाणे येथे केला त्या ऋग्वेद आणि कोकण कला अकादमी निर्मित, अशोक समेळ लिखित व दिग्दर्शित प्रा. प्रदीप ढवळ यांच्या 'नरेंद्र ते विवेकानंद - एक झंझावात' या शारदा प्रकाशन प्रकाशित कांदबरीवर आधारित 'संगीत संन्यस्त ज्वालामुखी' नाटकाविषयी लिहावं असं वाटलं. या विश्वविक्रमाचे साक्षीदार आम्ही होतो, हे सांगायला अभिमान वाटतो. मुंबईवर झालेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्याचा निषेध म्हणून दहा प्रयोग न करता सलग अकरा प्रयोग सादर केले गेले.



प्रेक्षक न येण्याला आजची दर्जाहीन मराठी नाटकंच कारणीभूत आहेत असं सरसकट म्हणता येणार नाही. आजही चांगले प्रयत्न होताना दिसतात; तरी सुद्धा प्रेक्षकांची वानवा आहे. याची कारणं म्हणजे वर्तमान परिस्थिति, तरुण पिढीची मानसिकता, इंग्लिशाळलेली तरुण पिढी, इतर प्रभावी माध्यमांचे आकर्षण ही सांगता येतील.

४० तासात सलग ११ प्रयोगांचा विश्वविक्रम करणारं 'संगीत संन्यस्त ज्वालामुखी' हे नाटक खरंच सशक्त आशय-विषय-अभिनय व सादरीकरण या नव्या उर्जेनं सळसळणारं असंच आहे; नरेंद्र ते विवेकानंद हा झंझावाती प्रवास आपल्यासमोर या नाटकाद्वारे समग्र उलगडत जातो. अशोक समेळ यांनी लिहिलेले पल्लेदार, विचारगर्भ व विद्वत्ताप्रचुर संवाद विवेकानंदाची भूमिका करणाऱ्या तरुण, तडफदार संग्राम समेळ या अशोक समेळांच्याच मुलाने तितक्याच ताकदीने पेलले आहेत, अभिनीत केले ओहत. त्याची अभिनयाची उपजत खोल समज, तसंच संवादोच्चारात टायमिंगचं अचूक भान, विलक्षण बोलका चेहार, प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि रंगमंचावरचा (तीन पातळ्यांचा रंगमंच असून) त्याचा आत्माविश्वासपूर्ण वावर अगदी सहज बोलता बोलता प्रेक्षकात येऊन बसणं पुन्हा उठून जाणं कशा कशालाच तोड नाही. मूर्तिमंत नरेंद्र ते विवेकानंद म्हणून ते शोभले आणि ती भूमिका जगले आहेत. अप्रतिम, अगदी अवधूत गुप्त्यांच्या भाषेत बोलायचे तर 'तोडलंस रे मित्रा', असंच म्हणावंसं वाटतं. दुसरे शब्दच नाहीत वर्णन करायला.

अमेरिकेत बाहेर हिमवर्षाव होत असतांना ध्यान लावून बसलेल्या एका योग्याला पाहून ती अमेरिकन फॅमिली त्यांना आपल्या घरात घेऊन येते. तेच विवेकानंद त्या फॅमिलितल्या दोन तरुण मुलींना 'हाऊ आर यू माय

सिस्टर्स?' म्हणतात. नि त्या मुली हरवून जातात. त्या तरुण योग्याने आपल्याला सिस्टर्स म्हटल्याचे व त्या स्त्रीला त्यांनी मदर म्हटल्याचे खूप अप्रूप वाटते. त्यांनी विचारल्यावरून ते आपली कहाणी त्यांना सांगतात 'माझी आई मला लहानपणी प्रेमाने बिलेल म्हणायची - माझं नाव नरेंद्र पण ती बिलेलच म्हणायची.' इथून फ्लॅश बॅकने नाटक सुरू होते. छोटा बिलेल झालेल्या मुलानं, नरेंद्रच्या आई वडिलांनीही आपापली कामं उत्तम केली आहेत.

आणखी 'अप्रतिम' म्हणावं लागेल ते रामकृष्ण परमहंस यांची भूमिका करणाऱ्या आमदार संजय केळकरांना. या भूमिकेला त्यांनी तंतोतंत न्याय दिला आहे. ते ही भूमिका जगले आहेत व त्या भूमिकेला शोभले आहेत. संवादोच्चाराचं अचूक भान, वेडसरपणाची झाक, त्यांच्या चेहऱ्याच्या हावभाव व हातवारे, सतत होणारी बोटांची हालचाल यांतून व तसेच त्यांचे तपसामर्थ्य, ज्ञानाचे तेज त्यांच्या संवादातूनही प्रतिबिंबित होते. या नाटकात गुरु व शिष्य म्हणून ते एकमेकांसमोर तोडीस तोड उभे राहिले आहेत. नि मूर्तिमंत नरेंद्र ते विवेकानंद उभे करण्यात संग्राम समेळ व मूर्तिमंत राकृष्ण परमहंस साकार करण्यात आमदार संजय केळकर पूर्णपणे म्हणजे अगदी शंभर टक्के यशस्वी झाले आहेत. ते दोघेही इतके खरेखरे विवेकानंद व रामकृष्ण परमहंस वाटत होते, की नाटक संपल्यावर त्यांच्या दोघांच्या पायावर डोके ठेवावेसे वाटले.

नाटकात नेपथ्याचा बडेजाव नाही. जुजबी परंतु परिणामकारी नेपथ्य, सुयोग्य प्रकाश योजना, अशोक बागवे यांची भावपूर्ण प्रवाही गीतरचना, डॉ. विद्याधर ओक यांच्यासारख्या जातिवंत, जाणकार 'संगीतकाराच्या डोलायला लावणाऱ्या भक्तिपूर्ण भजनांच्या चाली. सारेच नाटकाची परिणामकारकता वाढवणारे, नाटकाशी एकरूप होणारे. 'गुरु संजीवन' हे नाटकाचा पडदा उघडायच्या आधीच नांदीचे भजन, तसंच नरेंद्रांच्या तोंडाचे 'गुरु तुमी, आधार तारणहार' ही दोन्ही भजनं, नर्तिकेचं नृत्यगीत सुरेख चालीत बांधली आहेत. कालीमातेचं नृत्य व नर्तिकेचं नृत्य नाटकात चपखल बसली आहेत. या नाटकात सर्वात भावते ती सगळ्या लहान मोठ्या कलाकारांची मनःपूर्वकता. रंगभूषा व वेशभूषाही कालसापेक्षा यथायोग्य आहेत.

रंगमंचाच्या तिन्ही पातळ्यांवरचा सर्व पात्रांचा विशेषतः विवेकानंद व रामकृष्ण परमहंस यांचा सहजतेनं होणारा वावर, विवेकानंदाचा अभिनिवेष ,संवादफेक, रामकृष्ण परमहंस यांच्या चेहऱ्यावरचे वेडसर वाटणारे पण ज्ञानवंताचे योग्याचे हावभाव तसेच शारिरीक हालचाल, हाताच्या बोटांची सतत होणारी हालचाल, हातवारे, शब्दोच्चार हे सर्व त्या त्या पात्राकडून करवून घेणं यामागे अशोक समेळांच्या दिग्दर्शनाची कमाल वाटते. संवाद लेखन, भाषेची खोली उंची संमोहक आहे. प्रेक्षकांना भारून टाकण्याचे सामर्थ्य अशोक समेळांच्या लेखन व दिग्दर्शनात आहे.

सर्व भारतीयांनी एकजूट करायला हवी जातिभेद, धर्मभेद विसरून. त्यासाठी त्यांनी आसेतू हिमाचल भ्रमंती केली घरादाराचा त्याग करून. 'उन्तिष्ठत-जागृती' हा मंत्र त्यांनी भारतीयांच्या मनात प्रेरित केला. आज त्या विचारांची देशाला पुन्हा आवश्यकता आहे. दहशतवादाच्या युगात आज हे विवेकानंदाचे ज्वलंत विचार लोकांपर्यंत पोहचवणे व देशाला 'उत्तिष्ठ जाग्रत' करण्याची नितान्त गरज आहे आणि ते कार्य करण्याचा विडा 'संन्यस्त ज्वालामुखी' च्या सर्व रंगकर्मींनी उचलला आहे. त्यामागे त्यांची अपार मेहनत व अथक परिश्रम आहेत. त्यासाठी आजच्या तरुण पिढीने नाटक पहायलाच हवे. आजच्या दहशतवादाच्या पार्श्वभूमीवर शाळांनी महाविद्यालयांनी त्यांना सहकार्य करायला हवे. विद्यार्थ्यांना हे नाटक पहाव्यास आवर्जून पाठवायला हवे. प्रवृत्त करायलव हवे.

अमेरिकेत सर्व धर्म परिषदेत त्यांनी 'सिस्टर्स ब्रदर्स'

---

मी मी करणारे सर्वार्थाने पोकळ असतात.

असं संबोधून सर्व अमेरिकनांना प्रभावित करून टाकलं. हिंदू धर्माचं व संस्कृतीचं पावित्र्य, महात्म्य त्यांनी जगासमोर परिणामकारक रित्या मांडलं. त्याची पताका जगभरातून आलेल्या प्रचंड पंडितापुढे फडकवली. आपल्या भारताचा, भारतीय संस्कृतीचा, हिंदू धर्माचा झेंडा जागतिक सर्व धर्म परिषदेत, जी अमेरिकेत शिकागोत भरली होती तिथे फडकवला. त्या स्वामी विवेकानंदाच्या चरित्रावर 'संन्यस्त ज्वालामुखी' ह्या नाटकाचे ४० तासात सलग ११ प्रयोग करून विश्वविक्रम केला. ते हे नाटक यंदा सॅनफ्रॅन्सिस्को इथे भारणाऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनात होणे उचित ठरले असते. विश्वमराठी साहित्य संमेलनात नाही, तर पुढील वर्षी परदेशात होणाऱ्या नाट्य संमेलनाने 'संगीत संन्यस्त ज्वालामुखी या नाटकाला संमेलनासाठी सन्मानाने आमंत्रित करावे. या नाटकाचा प्रयोग, इतर नाटकं होण्यापेक्षा या विश्व मराठी साहित्य संमेलनात व्हायलाच हवा होता.

'आदिपश्य' ह्या नाटकाला अलिकडेच कोलकत्यातील रित्विक आंतरराष्ट्रीय नाट्यमहोत्सवासाठी सन्मानानं निमंत्रित करण्यात आलं होतं. ते नाटक पाहून त्या महोत्सवाचे संयोजक मोहितदा खूश होऊन म्हणाले, 'निखिलदा, हमारे पास पैसा कम है। मगर दिल बहोत बड़ा है। महाराष्ट्रसे हर साल नाटक भेजना।, तर लेखक दिग्दर्शक अशोक समेळ व आमदार संजय केळकर यांनी त्यांच्या या बोलावण्याचा विचार करावा. 'आदिपश्य' सारखंच हेही दर्जेदार नाटक. शिवाय विवेकानंदावरचे. तेव्हा ते कोलकात्तावासियांना नक्कीच आवडेल.

विश्व मराठी साहित्य संमेलनाचे व कोलकत्याच्या रित्विक आंतरराष्ट्रीय नाट्यसंमेलनाचे आमंत्रण ' संगीत संन्यस्त ज्वालामुखी'ला यावे व या नाटकाने विश्व मराठी साहित्य संमेलन व कोलकत्याचे रित्त्विक आंतरराष्ट्रीय नाट्यसंमेलन गाजवावे व त्याचे पडसाद आम्हा मराठी नाट्यरसिकांच्या कानावर पडवेत हीच सदिच्छा व्यक्त करते.

या नाटकाचे महाराष्ट्रात व महाराष्ट्रबाहेरही जगभर खूप प्रयोग व्हावेत त्याला नाट्यरसिकांचा उदंड, भरभरून, भरघोस प्रतिसाद मिळावा. व त्यांचे कार्य पूर्णत्वास जावे म्हणून नटराजाला मनोमन प्रार्थना करूया. हे उदात्त, महान, मंगल कार्य करणाऱ्या संपूर्ण टीमला 'संगीत संन्यस्त ज्वालामुखीच्या' सर्व रंगकर्मींना माझा सलाम व प्रणाम. विवेकानंदानी हिंदुधर्माचा झेंडा जागतिक धर्म परिषदेत अमेरिकेत फडकवला. त्या विवेकानंदाचे विचार या नाटकाद्वारे जगभर विचरो हीच सदिच्छा व शुभेच्छा.

विशेष टीप - हे नाटक एक 'मिशन' स्वरूपात विवेकानंदाचे विचार जगभर तरूण पिढीपर्यंत पोचावेत या महान उद्देशाने सर्व कलाकार (रंगकर्मी) विनामूल्य काम करीत आहेत. तेव्हा सेवाभावी संस्थानी शाळा कॉलेजांनी याचे प्रयोग ठेवावेत. जगन्नाथाचा रथ ओढायला सर्वांनीच हात लावायला हवा.

**श्रीमती आशा भिडे**

बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

*हे ईश्वरा, सर्वांना सुखात, आनंदात ठेव. त्यातच माझे सुख सामावले आहे.*

*- एक प्रार्थना*

# सत्संग

*माणसाच्या जीवनात संगत व सत्संग यांना अपार महत्त्व आहे. सत्संग लाभण्यास भाग्य लागते असे म्हणतात. दिशाचे हितचिंतक व लेखक श्री. यशवंत माने यांनी या विषयाच्या अनुषंगाने घेतलेला आढावा - संपादक*

हजारो वर्षापासून अनेक शाळा, महाविद्यालये तसेच शिक्षणसंस्था यांच्यामार्फत शिक्षण देण्याचे काम अखंड सुरू आहे. पण माणसामध्ये माणूस म्हणून जी सुधारणा व्हायला हवी ती झाल्याचे आजही दिसून येत नाही. अनेक ठिकाणी आपण पहातो की, शिक्षण संस्थांमध्येच विविध प्रकारचे भ्रष्टाचार चालल्याचे दिसून येतात. शाळा, महाविद्यालयातच मुले विविध कारणावरून एकमेकांवर अत्याचार करतात. काही ठिकाणी तर गुरूच विद्यार्थ्यांचा छळ करीत आहेत असे चित्र दिसून येते. तात्पर्य काय तर आजच्या शिक्षण पद्धतीमुळे माणसामध्ये माणूस म्हणून हवी ती सुधारणा / जडणघडण झालेली दिसून येत नाही. माणूस म्हणून जी काही आपली कर्तव्ये आहेत किंवा ज्या काही जबाबदाऱ्या आहेत त्या त्याला आजही स्पष्ट झालेल्या दिसून येत नाहीत. शिक्षण घेऊन बाहेर पडल्यानंतरही अनेक विद्यार्थांकडून खून, मारामाऱ्या, दरोडे, भ्रष्टाचार होत असल्याचे दिसून येतात. (काही शाळा अपवादही असतील). मग अशी शिक्षणपद्धती काय कामाची? माणसाला माणूस म्हणून घडवायचे असेल, त्याला माणुसकीची जाण करून द्यायची असेल किंवा त्याला त्याच्या जबाबदाऱ्यांची आठवण करून द्यायची असेल तर आजच्या शिक्षण पद्धतीत थोडा बदल करून आध्यात्मिक शिक्षणावर जास्त जोर दिला पाहिजे. आज जे काही आध्यात्मिक शिक्षण दिले जात आहे ते तोकडे पडते आहे असे वाटते. आध्यात्मिक शिक्षणच माणसाला माणूस म्हणून घडवू शकते. असे शिक्षणच माणसाला तारू शकते. आध्यात्मिक मार्गच माणसाला वाईट विचारांपासून रोखू शकतो. म्हणून आज प्रत्येक शाळा, महाविद्यालये आणि वेगवेगळ्या शिक्षण संस्थामधून किमान सहा महिन्यातून किंवा वर्षातून एकदा तरी सद्‌गुरूंची व्याख्याने / प्रवचने सत्संगाच्या मार्फत आयोजित करावीत. आशा प्रकारची सक्ती शिक्षणसंस्थाना केल्यास ते वावगे ठरणार नाही असे वाटते.

सत्संगामुळे माणसाला मानसिक सुख आणि समाधान मिळते. मन शुद्ध आणि पवित्र रहाते. सर्व वाईट विकारांपासून ते दूर रहाते. आपल्या हातून कोणतेही पापकर्म घडू शकत नाही. पापकर्म करण्यास माणसाचे मन धजावत नाही. सत्संगात आल्यानंतर माणसाचे पूर्वीचे पापही नष्ट होते. काही लोक म्हणतील सत्संगात गेल्यानंतर माणसांचे पूर्वीचे पाप नाहीसे होते तर मग ते पाप जाते कोठे? मी तर असे म्हणतो की, जे लोक सत्संगाला जात नाहीत, सत्संगाची घृणा करतात अशा लोकांच्या डोक्यावर ते पाप जाऊन पडते. म्हणून माणसाच्या जीवनात सत्संग महत्वाचा असतो. त्याचप्रमाणे सत्संगामुळे माणसाचे जीवन प्रकाशमय होत असते. जीवनातील अंधकार नष्ट होऊन घरात सुख, शांती नांदत असते. आपण आपल्या घरात प्रकाश यावा म्हणून वेगवेगळ्या पद्धतीने वेगवेगळ्या ठिकाणी वायरिंग करून घेत असतो. केवळ घरात वायरिंग करून घेतली म्हणजे आपणास प्रकाश मिळत नाही. त्यासाठी आपल्या घरातील वायरिंगची जोडणी विद्युत घराशी (Power House) करून घ्यावी लागते. त्याशिवाय घरात प्रकाश येत नाही. तसेच सत्संग म्हणजे सुद्धा एक विद्युत घरच (Power House) असते. आपल्या घरात सुखमय प्रकाश आणावयाचा असेल तर आपण त्या विद्युत घराशी (Power House) जोडले

गेलो पाहिजे. जर आपण जोडले गेलो तरच घर प्रकाशमय होईल. घरात सुख नांदेल. म्हणून आपण सत्संगरूपी विद्युत घराशी जोडले गेलो पाहिजे.

काही अशिक्षित किंवा भाषेची थोडी कमी समज असणाऱ्या व्यक्ती म्हणतील की, सत्संगाची भाषा समजायला अवघड आणि क्लिष्ट असते. ती लवकर कळत नाही. त्यामुळे अनेक गोष्टी डोक्यावरून जातात. म्हणून सत्संगाला जावे वाटत नाही. त्यामध्ये रूची वाटत नाही. अशा मंडळींना सांगू इच्छितो की, जरी आपणास सत्संगाची भाषा समजण्यास अवघड वाटत असली तरीही सत्संगाला जा. कारण सत्संगामध्ये सद्गुरूकडून ज्या काही गोष्टी सांगितल्या जातात त्या सर्वच्या सर्व आपणास समजल्या पाहिजेत असे नाही. त्यामधील काही ठरावीक वाक्ये किंवा मुद्दे समजले तरी पुरेसे असते. कारण सत्संगातून सांगितलेले एखादे वाक्य सुद्धा तुमचे पूर्ण आयुष्य बदलू शकते. तुमच्या आयुष्याला कलाटणी देऊ शकते. तुमचे पूर्ण जीवनमान बदलून टाकण्याची क्षमता त्या वाक्यात असते. सत्संगामध्ये सांगितलेल्या गोष्टींपैकी आपणास ज्या गोष्टी पटतात, जे विचार रुचतात अशाच गोष्टी ध्यानात घ्यायच्या असतात. ज्या गोष्टी डोक्यावरून जातात, त्यांचा विचार करत बसण्याची गरज नसते; ज्याप्रमाणे आपण एखाद्या दुकानात गेल्यावर दुकानातील सर्वच्या सर्व वस्तू खरेदी करीत नाही कारण त्या सर्व वस्तूंची आपणास गरज नसते. ज्या वस्तूंची आपणास गरज असते किंवा आपल्या खिशाला परवडेल अशाच वस्तूंची आपण खरेदी करीत असतो. तसेच सत्संगामधूनही आपल्या बुद्धीला पेलेल तेवढेच घ्यायचे असते.

सत्संगातून केवळ विचारच घ्यायचे नसतात तर ऐकलेले विचार आचरणात आणावयाचे असतात. ज्याप्रमाणे दुकानातील वस्तू विकत घेऊन आपण ती केवळ घरात ठेवत नाही तर त्या वस्तूचा उपभोग घेतो. त्या वस्तूचा वापर केला जातो. त्या वस्तूचा उपयोग केल्यानंतरच आपणास समाधान वाटते. परंतु आपण खरेदी केलेली वस्तू फक्त ठेवून दिली तर काही काळाने ती खराब होऊन जाते. तसेच विचार आचरणात आणले नाहीत तर ते निरुपयोगी/ निरर्थक ठरतात. त्याचा जीवनात काहीही उपयोग नसतो.

सत्संग सहजासहजी घडून येत नाही. काही लोकांच्या मनात सत्संगाला जाण्याची खूप इच्छा असते. पण त्यांच्या पुढे अचानक अडथळा येऊन ते सत्संगाला जाऊ शकत नाहीत. परंतु काही लोकांच्या ध्यानीमनी नसतानाही अचानक सत्संगाला जाण्याचा योगायोग येत असतो. हे असे का घडते हे पुढील उदाहरणावरून अधिक स्पष्ट करता येईल. समजा आपल्या एखाद्या नातेवाईकाचे घरी लग्न समारंभ असेल तर ती व्यक्ती आपणास लग्नासाठी निमंत्रण देत असते. कारण ती व्यक्ती ज्या - ज्या लोकांना ओळखत असते त्या ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीच्या नावामध्ये आपल्याही नावाचा समावेश असतो. म्हणून ती व्यक्ती आपणास लग्नाचे निमंत्रण देत असते. आपण अशा लग्न समारंभाला जात असतो. जर तीच व्यक्ती आपल्या ओळखीची नसेल तर आपणास निमंत्रणही देणार नाही आणि आपणही त्या लग्न कार्याला जाणार नाही. त्याचप्रमाणे ज्या ज्या व्यक्तीना परमेश्वर ओळखतो अशा व्यक्तीच्या नावांची यादी परमेश्वराकडेही असते; म्हणून अशा व्यक्तीच सत्संगाला येत असतात. अशा लोकानांच परमेश्वर निमंत्रण देत असतो. आपल्या सर्वांना प्रश्न पडला असेल की, परमेश्वराजवळील यादीत आपले नाव येण्यसाठी काय केले पाहिजे म्हणजे परमेश्वर आपणास निमंत्रण देऊ शकेल? पुन्हा एकदा किराणा दुकानाचे उदा. घेऊन हे अधिक स्पष्ट करता येईल. किराणा दुकानात आपले उधारीचे खाते असेल तर तो दुकानदार प्रत्येक महिन्याला खाते बुक पाहून तुमची आठवण काढल्याशिवाय रहाणार नाही. कारण देण्याघेण्याचा हिशोब चुकता करायचा असतो. त्यामुळे तो नेहमी आपल्या संपर्कात येण्याचा विचार करीत असतो. परंतु त्या दुकानात आपले खाते नसेल तर तो आपली

आठवणही काढणार नाही. तो आपणास ओळखणारही नाही. म्हणून आपलेही परमेश्वराजवळील यादीत नाव यावे असे वाटत असेल तर परमेश्वराजवळ आपले जे खाते असते त्यामध्ये पुण्याई असावी लागते. पुण्याईचे गाठोडे त्यांच्या खात्यात जमा नसेल तर तो आपणास निमंत्रण देणार नाही. आपली आठवणही तो काढणार नाही. म्हणून परमेश्वराच्या खात्यात जी पुण्याई जमा आहे ती संपवू नका. त्यामध्ये नेहमी भरच घालत चला. ती पूर्णपणे खर्च न करता थोडी शिल्लक ठेवा. ज्याप्रमाणे तुम्ही तुमच्या दुकानदाराची उधारी पूर्ण केली असता तुमच्या दोघांचा संबंध संपुष्टात येतो. आता आपले काही देणे-घेणे नाही असे वाटत असते. त्याचप्रमाणे परमेश्वराजवळील पूण्याई तुम्ही पूर्ण खर्च केलीत तर तुमचेही त्याच्याशी असलेले नाते / सबंध संपुष्टात येतील हे लक्षात ठेवा.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३, सुभाष रोड,
कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे

●●●

## टी. व्ही. आणि मानवी आयुष्य

➢ मर्यादित मानवी आयुष्यातील हजारो तास आपण निव्वळ टी. व्ही. बघण्यात घालवतो.

➢ एवढ्या करमणुकीची निरोगी मानवी मनासाठी काहीच गरज नसते.

➢ सक्रिय करमणुकीतच कौशल्याचा विकास, व्यायाम, मानवी संबंधात सुधारणा व तत्सम फायदे होऊ शकतात.

➢ टी. व्ही. बघणे हा सर्वात निष्क्रिय असा करमणुकीचा प्रकार आहे. यात शरीरच नव्हे तर मेंदूही अतिशय निष्क्रिय होतो.

➢ टी. व्ही. बघायला लागल्यापासून काही क्षणातच मेंदूलहरींमध्ये अनिष्ट बदल होतात. मंद, विश्लेषण करण्यास असमर्थ अशा मेंदूलहरी दिसू लागतात. तार्किक कार्य करणारा डावा मेंदू जणू अर्धजागृत अवस्थेत जातो.

➢ टी. व्ही. बघताना कोणत्याही प्रकारच्या कल्पना, अर्थ समजावून घेण्यासाठी कोणतीही प्रक्रिया उत्तेजकावर करावी लागत नाही. कारण टी.व्ही. बघताना दृश्य स्वरूपात सारे तयार असते.

➢ यामुळेच ज्ञानार्जनासाठी टीव्हीचा फारसा उपयोग होत नाही. निव्वळ एक आरामशीर सवय म्हणूनच आपण टी. व्ही. बघतो.

➢ टी. व्ही. बघता बघता काही काम वा व्यायाम इ. चालू ठेवला तर ज्ञानेंद्रियांवर व मेंदूवर दुष्परिणाम कमी होतो.

➢ टी.व्ही. बघण्यापेक्षा पुस्तक वाचणे वा रेडिओ ऐकणे केव्हाही चांगले. कारण हे दोन्ही करताना मेंदू खूपच सक्रिय राहतो.

➢ प्रकाशाच्या उगमाकडे सतत पाहिल्याने तसचे इलेक्ट्रॉनिक स्कॅनिंगमुळे तयार होणाऱ्या व ठिपक्या ठिपक्यांपासून निर्माण कराव्या लागणाऱ्या आकृतीमुळे टी.व्ही. बघताना डोळ्यांवर नाहक ताण पडतो.

➢ टी. व्ही. तून अल्प प्रमाणात बाहेर पडणाऱ्या विविध हानिकारक किरणांमुळे शरीरांतर्गत स्त्रावांवर व स्वास्थ्यावर वाईट परिणाम होतो.

➢ तात्पर्य, हात पाय थकल्यावर वा इतर सर्व कामे संपल्यावर काही वेळ टी.व्ही. समोर घालवला तर एक वेळ क्षम्य ठरेल पण तासन्तास तसे घालवणे योग्य नव्हे.

➢ सायंकाळी फिरणे, चारचौघांत मिसळणे यामुळे मानसिक व शारीरिक स्वास्थ्य दोन्ही उत्तम राहते.

●●●

# एक तरी 'वारी' अनुभवावी

## (वारी : एक शोध - वृत्तांत)

*वारकरी पंथाचे मराठी जीवनात असणारे योगदान फार मोठे आहे. या वारी संबंधात एक अभ्यासपूर्ण कार्यक्रम मुंबईच्या रुपारेल महाविद्यालयात झाला. विषयाचे वेगळेपण ध्यानात घेऊन या कार्यक्रमावरील वृत्त लेख येथे देत आहोत - संपादक*

श्रीसंत तुकाराम महाराजांच्या चतुर्थ जन्मशताब्दी निमित्त, मुंबई विद्यापीठ - मराठी विभाग; श्रीपाद सेवा मंडळ, पुणे आणि डी. जी. रुपारेल महाविद्यालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'वारी : एक शोध' असा पारंपारीक, सांप्रदायिक व शैक्षणिक संगम असलेला कार्यक्रम १६, १७, १८ फेब्रुवारीस डी. जी. रूपारेल महाविद्यालयाच्या पटांगणात पार पडला. संध्याकाळी ५.३० ते ८.३० या सोईच्या वेळेत हा कार्यक्रम असल्याने बऱ्याच श्रोतवर्गाला याचा आनंद घेता आला. कीर्तन, सादरीकरण आणि विवेचन असे कार्यक्रमाचे स्वरूप होते. त्यामुळे संत वाङमयाची, अध्यात्माची आवड असलेल्या श्रोत्यांबरोबरच अभ्यासक आणि विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती.

या पूर्वी पुणे विद्यापीठ, संत ज्ञानदेव अध्यासन आणि श्रीपाद सेवा मंडळ, पुणे यांनी एकत्रितपणे तीन दिवसांचे संत ज्ञानदेव वाङ्मय - अभ्यास चर्चासत्र' तसेच मुंबई विद्यापीठ - मराठी विभाग आणि श्रीपाद सेवा मंडळ, पुणे यांची तीन दिवसांची 'संत साहित्य परिशीलन व्याख्यानमाला' अशा दोन कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केले होते. असाच एक कार्यक्रम मुंबईत विद्यापीठाच्या परिघाबाहेर व्हावा म्हणून श्रीपाद सेवा मंडळाने पुढाकार घेऊन संत वाङ्मय आणि पारंपरिक आध्यात्माची वैचारिक मेजवानी मुंबईतील जनसामान्यांबरोबर विद्यार्थी - प्राध्यापक वर्गापर्यंत पोहचविण्याकरिता, तसेच संत वाङ्मयाला एक शैक्षणिक दर्जा प्राप्त करून देण्याकरिता मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला. प्रस्तुत कार्यक्रमात ह. भ. प. श्री. मुकुंदमहाराज जाटदेवळेकर महाराजांचे 'वारकरी संप्रदायातील कीर्तन', श्री रोहन उपळेकर आणि सहकारी यांचे वारीचे सादरीकरण, प्रा. डॉ. शं. रा. तळघट्टी यांचे 'वारकरी वाङ्मय : एक आढावा' हे व्याख्यान आणि श्रीपाद सेवा मंडळाचा पारंपरीक 'श्रीहरीपाठ' सादर करण्यात आले.

**उद्घाटन :**

कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. वसंत पाटणकर यांच्या हस्ते, रूपारेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप कुलकर्णी यांच्या अध्यक्षीय उपस्थितीत संपन्न झाले. व्यासपीठावर श्रीपाद सेवा मंडळाचे अध्यक्ष प. पू. श्री. शिरीषदादा कवडे उपस्थित होते. या वेळी प. पू. श्री. शिरीषदादांच्या हस्ते कार्यक्रमाच्या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष, रुपारेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप कुलकर्णी यांनी आपले विचार व्यक्त करताना, रुपारेलच्या विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत सादर केलेल्या



**स्मरणिकेचे प्रकाशन**

'पालखी' या एकांकिकेचा संदर्भ देत, आध्यात्मिक परंपरा व सामाजिक जाणीव जागृत असलेल्या आपल्या महाविद्यालयाची निवड अशा सुंदर कार्यक्रमाकरीता विद्यापीठाने केली याबद्दल आभार मानले. प. पू. श्री. शिरीषदादांनी आपले सद्विचार मांडताना या कार्यक्रमाच्या आयोजनाचा हेतू स्पष्ट केला, ते म्हणाले, 'वारी हे मनुष्याच्या आयुष्यातील दु:खनाशाचे साधन असून मनुष्याला सुखाचा आत्मिक अनुभव देणारा आनंद सोहळा आहे. या आनंद सोहळ्याच्या आस्वाद कसा असतो याचा अनुभव घेण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे.'

पहिल्या दिवशीचा प्रमुख कार्यक्रम 'वारकरी संप्रदायातील कीर्तन' सादर करण्यात आले. पाथर्डी येथील ह.भ.प. श्री. मुकुंदकाका शाहूमहाराज जाटदेवळेकर यांनी अत्यंत रसाळ वाणीत त्यांचे कीर्तन सादर केले. श्री. जाटदेवळेकर महाराज एक अत्यंत रसाळ प्रवचनकार म्हणून प्रसिद्ध आहेत. संपूर्ण ज्ञानेश्वरी त्यांना मुखोद्गत आहे. मराठी आणि संस्कृत या दोन्ही भाषांवर त्यांचे तितकेच प्रभुत्व आहे. आपल्या कीर्तनाच्या पार्श्वभूमीला त्यांनी या कार्यक्रमाचे महत्त्व विषद केले. 'संत साहित्य आणि मराठी साहित्य यांच्या एकरूपतेचा योग म्हणजे आजचा कार्यक्रम आहे. ज्या साहित्यात भगवंतांचे वर्णन नाही, मानवी जीवनाचे मूल्य नाही, विधायक परिवर्तन नाही, त्याला




**कीर्तन सादरीकरण**

साहित्य म्हणवत नाही; आणि हे सगळं साहित्यात येण्यासाठी त्या साहित्याला संत साहित्याची जोड द्यायला हवी.' आजच्या आपल्या कीर्तन सेवेसाठी महाराजांनी -

'तुजविन एकली रे कृष्णा न गमे राती
तव तुवा नवल केले विणा घेऊन हाती ...'

ही श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांची विरहिणी घेतली होती. अत्यंत रसाळ वाणीत आणि समर्पक दाखले देत महाराजांनी श्रोत्यांना दोन - अडीच तास मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचं आणखी एक विशेष म्हणजे कु. अनघा मांडवकर यांच सुमधुर सूत्रसंचालन, कु. मांडवकर ह्या रूपारेलच्या मराठीच्या प्राध्यापिका आहेत. आपल्या मधुर वाणीनं विषयाशी निगडित पण सूचक असं सूत्रसंचालन तीनही दिवशी सर्वांना मोहीत करीत होतं. रुपारेलच्या मराठीच्या दुसऱ्या पाध्यापिका सौ. वैशाली जावळेकर यांनी वक्त्यांची करून दिलेली ओळखही अभ्यासपूर्ण होती.

**चंद्रभागेच्या वाळवंटात :**

दुसऱ्या दिवशी 'वारी : एक आनंदयात्रा' हे श्री. रोहन उपळेकर आणि सहकारी यांचे वारीचे सादरीकरण झाले. या दिवशी प्रमुख अतिथी म्हणून श्री. प्रभाकर पणशीकर उपस्थित होते. पणशीकरांनी याआधी श्री. रोहन उपळेकर यांचे वारीचे सादरीकरण ठाण्याला पाहिले होते. तेव्हाच्या आठवणी सांगताना ते म्हणाले, 'हा कार्यक्रम पाहताना आपण इतके बेभान होऊन जातो की, खरोखरच आपण चंद्रभागेच्या वाळवंटात उभे आहोत असे वाटते. सर्व परिसरच विठ्ठलमय होऊन जातो. हे सादरीकरण म्हणजे वारी अनुभवाची पर्वणीच होती.'

दोन मित्रांच्या संवादातून उलगडत जाणारी ही 'वारी' उपळेकर मंडळींनी अप्रतिमरीत्या सादर केली आहे. नवमीला आळंदीहून निघालेली माऊलींची पालखी दोन दिवस पुण्यात थांबून सासवडकडे जाते. तेथून पुढे जेजुरी, वाल्हे, नीरा, फलटण, नातेपुते, माळशिरस, वाखरी, पंढरपूर अशी मुक्कामाला पोहचते. आळंदी ते पंढरपूर हा वारीचा




वारीतील एक दृश्य



वारीतील फुगडी

प्रवास त्यातील रूढी, परंपरा, संस्कृती, पालखीचा प्रस्थान सोहळा, वारीतील दिनक्रम, भजनाची पद्धत, कीर्तनाचे प्रकार, समाज आरती, मानाची कीर्तने, दिंड्यांची माहिती, पालखी सोहळयातील 'रिंगण' हा प्रकार, रिंगण सोहळ्यानंतर होणारा 'उडीचा कार्यक्रम', 'फुगडी, पावली, असे एकूण वारीच्या मार्गात जे जे काय घडते त्याचा न्याट्यमय मागोवा उपळेकर घेतात. सदर कार्यक्रम माहितीरूप सादरीकरण असल्याने उपळेकरांनी बरीच ऐतिहासिक व पारंपरिक माहिती पुरविली आहे. वारी प्रथेच्या इतिहासाची माहिती देताना ते सांगतात, 'वारीची प्रथा फार पूर्वापार आहे. श्रीसंत ज्ञानेश्वर, नामदेव, सावतामाळी, चोखामेळा, तुकाराम महाराज आदी सर्व संत त्यांच्या काळात पंढरीच्या पांडुरंगाची वारी करीत असत. परंतु आज उभ्या जगाला कुतुहलाचा विषय असणाऱ्या अतिशय शिस्तबद्ध, सुंदर आणि भव्य पालखी सोहळ्याचे आद्य संयोजक वै. हैबतरावबाबा आरफळकर (पवार) हे होत. १८३२ साली पहिल्यांदा डोक्यावर माऊलींच्या पादुका घेऊन हैबतदादांनी हा सोहळा सुरू केला. बाबांनी वारी सुरू करताना सुरुवातीच्या दिंडीवाल्यांना शिस्त लावून देऊन चालण्याचा क्रम, भजनाची पद्धत, सोहळ्यातील इतर प्रथा, वाद उत्पन्न झाल्यास निर्णय घेण्याची पद्धत, योग्य पद्धतीने आखून दिली होती, ती आजही तशीच पाळली जाते.' दिंडीची माहिती देताना ते सांगतात, 'पालखी सोहळ्यामध्ये माऊलींच्या रथापुढे अधिकृत २७ व रथामागे १२५ आणि अनधिकृत साधारण १२० दिंड्या चालतात.' उपळेकर न्हाव्याचे कीर्तन, वासुदेव, पोतदार, फुगडी, पावली, उडीचा कार्यक्रम प्रत्यक्ष स्टेजवर सादर करतात. 'रिंगण सोहळा' व पालखीतील अत्युच्य आनंद अनुभवण्याचा क्षण. त्याबद्दल उपळेकर माहिती देतात, ती अशी - उभे रिंगण व गोल रिंगण अशी दोन प्रकारची रिंगणे होतात. संपूर्ण पालखी सोहळ्यात तीन उभी रिंगणे होतात. पहिले लोणंद सोडल्यानंतर चांदोबाचा लिंब येथे, दुसरे भंडीशेगावनंतर बाजीराव विहीरीजवळ, व तिसरे वाखरी सोडल्यानंतर पंढरपूर पादुकांजवळ. गोल रिंगणे चार होतात. पहिले सदाशिवनगर, दुसरे खुडूस ओढा, तिसरे ठाकूरबुवा आणि चौथे व सर्वात मोठे वाखरी जवळील बाजीराव विहीर येथे होते.

पंढरीस येणाऱ्या वारकऱ्यांची, श्रीविठ्ठलच सर्वकाळ आपला योगक्षेम सांभाळतो अशी श्रद्धा असते. याचे अनुभव उपळेकर कथन करतात तेव्हा डोळ्यांत अश्रू दाटतात. पंढरीमध्ये प्रवेश करताना सर्वात मागे श्री ज्ञानेश्वर महाराज, त्यापुढे श्री संत तुकाराम महाराज, व त्यापुढे इतर संतांच्या पालख्या असतात. नवीन येणारी पालखी सर्वात पुढे असते. यामागे, माऊलींकडे सर्वसंतांचे पालकत्व असल्यामुळे सर्वांना पुढे घेऊन मगच आपण पंढरीमध्ये प्रवेश करायचा अशी श्रद्धा आहे. त्यानंतर विठ्ठलाचे दर्शन. डोळ्यांचे पारणे

फेडणारा हा दर्शन सोहळा उपळेकर प्रोजेक्टरद्वारा क्लिपींग दाखवून करतात. वारकऱ्यांना मात्र विठ्ठलाचे मिळाले तरच दर्शन; नाहीतर मंदिराच्या कळसाचे दर्शन घेऊन पौर्णिमेला दुपारी ४ वा. माउलींच्या पालखीच्या परतीचा प्रवास सुरू होतो. आषाढ वद्य दशमीस पालखी आळंदी मध्ये स्वगृही प्रवेश करते आणि हा कार्यक्रम संपतो. महिनाभराच्या आनंद सोहळ्याची साश्रू नयनांनी सांगता होते. प्रत्येकाच्या ह्दयात आता पुढील वारीचे वेध लागलेले असतात.

उपळेकरांनी सादर केलेल हे सादरीकरण प्रत्येक श्रोत्याला पालखीसोबत घेऊन गेललं असतं. आपण प्रत्यक्ष विठ्ठलांच दर्शन घेऊन परतलोय अस वाटतं, मन अगदी भारावून गेलेल होतं. आता यानंतर काही घडूच नये अस सारख वाटत रहातं.

**अभ्यासपूर्ण व्याख्यान :**

तिसऱ्या दिवशी डॉ. शं. रा. तळघट्टी सरांचे 'वारकरी वाङ्मय : एक आढावा' हे अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. सरांनी २६ वर्षे अध्यापन केलेल आहे. त्यांचा तत्वज्ञानाचा अभ्यासही उल्लेखनीय आहे. विविध पदकं, शिष्यवृत्ती व पुरस्कारांनी सर सन्मानित आहेत. आपल्या व्यासंगपूर्ण सखोल व्याख्यानात डॉ. तळघट्टी सरांनी एकूण संतवाङ्मयाचा आढावा घेत संतवाङ्मयातील प्रस्थान त्रयी म्हणून 'एकनाथी भागवत', 'ज्ञानेश्वरी' आणि 'श्रीसंत तुकाराम गाथा' यांचा उल्लेख केला. वारकरी अक्षर वाङ्मयाचा ऐतिहासिक प्रवाह अत्यंत समर्पक दाखले देत विशद केला.

डॉ. तळघट्टी सरांच्या व्याख्यानानंतर श्रीपाद सेवा मंडळाचा पारंपरीक पद्धतीनुसार श्रीज्ञानदेव महाराजांचा हरिपाठ संपन्न झाला. तीन दिवस कीर्तन, सादरीकरण आणि विवेचनाच्या माध्यमातून चाललेला 'वारी'चा शोध माऊलींच्या हरिपाठाने संपला व त्या पाठोपाठ समारोपाचा कार्यक्रम झाला.

समारोपाच्या वेळी श्रीपाद सेवा मंडळाचे अध्यक्ष, प. पू. शिरीषदादांनी तीन दिवसाच्या या पवित्र कार्यक्रमाचे मर्म विषद केले, 'पहिले दोन दिवस आपण कीर्तन आणि सादरीकरणाच्या माध्यमातून वारीच्या बहिरंगाचा धांडोळा घेतला, आज तिसऱ्या दिवशी वारीच्या अंतरंगाचा शोध घेऊ पाहिला. श्रीसंत तुकाराममहाराजांच्या एका अप्रसिद्ध अभंगाच्या माध्यमातून प. पू. दादांनी वारीचे अंतरंग - आर्वतन पटवून सांगितले. 'भ्रम' हा आपल्याला वारीपासून, चांगल्या गोष्टींपासून दूर ठेवत असतो. याची उपरती व्हायला हवी. वारीच्या अनुभवाची ओढ आपल्याला लागावी हेच उद्दिष्ट या तीन दिवसाच्या कार्यक्रमाचे होते असे सूचित करून सर्व उपस्थितांना धन्यवाद दिले.

तिसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे प्रकुलगुरु डॉ. अरुण सावंत आवर्जून उपस्थित होते. दोन दिवस या सुरेख कार्यक्रमासाठी उपस्थित राहता न आल्याची खंत डॉ. सावंत यांनी व्यक्त केली. श्रीपाद सेवा मंडळाने अशा प्रकारच्या उपक्रमांसाठी पुढाकार घेऊन संत साहित्याला विद्यापीठीय कक्षेत आणावं. अशा कार्यक्रमांसाठी विद्यापीठ सर्वतोपरी मदत करील असे मतही त्यांनी व्यक्त केले.

त्यानंतर रुपारेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. प्रदीप कर्णिक यांनी हा कार्यक्रम सफल करण्यामागे सद्गुरूप्रेरणेने कार्यरत असलेल्या सर्वांचे यथोचित आभार मानले आणि अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून संतसाहित्याचा गाभा लोकांपर्यंत पोहोचायला हवा असे मत व्यक्त केले. शेवटी पसायदान होऊन, 'एक तरी ओवी अनुभवावी' या न्यायाने 'एक तरी वारी अनुभवावी' अशी इच्छा मनात घेऊन कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

**श्री. सचिन गराटे**
४०३/१०. 'चिनार' ग्रीन वेज को. ऑ. हौ. सोसा.,
अगरवाल कॉप्लेक्स, मिरागावठण,
काशिमिरा, मिरारोड (पू.), ठाणे - ४०१ १०७.
दूरध्वनी : ९९६९१२२३०१

●●●

# मोर : माणसाच्या जीवनातला

*मोर या अतिशय सुंदर पक्ष्याबद्दलची ही निरीक्षणे - संपादक*

निसर्ग सान्निध्यात असे अनेक पक्षी भेटतात की ज्यांनी आपल्या अस्तित्वाला मानवी मनात, संस्कृतीत, जीवनात आगळ वेगळ रूप दिलं आहे. संत काव्यापासून ते आजकालच्या कवितेपर्यंत काय किंवा भाषा फुलविणाऱ्या म्हणी व संप्रदायांच्या शब्दसमूहात काय कितीतरी पशुपक्षी आपले स्थान निर्माण करून बसलेले दिसतात. लोकसाहित्य हे तर जिवंत समाज मनाचे प्रतिबिंब. त्यातही 'माझिया माहेरा जा' सारखे असंख्य संदर्भ आपल्या जीवनाला समृद्ध करतात.

असाच आपला इतिहास, भूगोल भूतवर्तमान व्यापणारा पक्षी महणजे मोर. अरसिक मनातही काव्याचा पिसारा फुलवत नाचणारा पक्षीराज. उत्तर ठाणे जिल्ह्यातील दाट जंगलातून किंवा संजय गांधी उद्यानाच्या भांडुप जलशुद्धीकरण प्रकल्पापर्यंत पसरलेल्या जंगलात अवचितपणे हा देखणा पक्षी ऐकू येतो, तेव्हा 'सुसंगति सदा घडो...' च्या ओळी नकळत मनात जाग्या होतात.

प्रत्यक्षात हा पक्षी पहाण्यापूर्वी या पक्षाने मानवी जीवन व्यापलंय तरी कसं या उत्सुकतेपोटी पुस्तके चाळत बसलो. एकातून दुसरा, दुसऱ्यातून तिसरा ... कितीतरी प्रश्न... किती तरी संदर्भ...

मोरोपंतांची केकावली उघडली. एकाहून एक रसोत्कट, भावना जागवणाऱ्या ओळी, परमेश्वराची प्रार्थना, आळवणी. मोरोपंतांचे पूर्ण नाव होते मयूरेश्वर रामाजीपंत पराडकर. या मयूराने फोडलेला आतं टाहो म्हणून केकावली. १२१ श्लोकांचे हे काव्य म्हणजे स्वत:च्या उद्धारासाठी देवाला मारलेली हाक.

दयामृत घना अहो हरि, वळा मयूराकडे
रडे शिशु तयासि घे कळावळोनि माता कडे

असे मोरोपंत या काव्यात म्हणतात. या ओळी वाचताना 'काळा काळा कापूस पिंजला रे' हे जाणून थुई थुई नाचणाऱ्या, टाहो फोडणाऱ्या मोराची आठवण किती सहज जागी होते.

मयूर या शब्दाने जिज्ञासा चाळवली. हा शब्द कोठून आला? विविध भाषांत या पक्ष्याला शब्द कोणते? कृ. पां. कुलकर्णींचा व्यत्पत्तिकोश, नरवाण्यांचे कोश... खूप पुस्तके घेऊन मोराचा शोध घेतला. हिंदीत मोर, मयूर, मोरवा ही नावं आहेत तर उर्दूत ताऊस. ताऊस शब्दाजवळ मन अडलं. बादशहा शहाजानच्या सिंहासनाला तख्त ताऊस म्हणतात. भारतीय संस्कृति कोशात संदर्भ लागला. त्या सिंहासनावर रत्नजडित मोर बसवले होते म्हणून ते तख्त ताऊस! ताऊस म्हणजे एक वाद्य असाही संदर्भ सापडला. पण खुलासा मिळाला नाही. गुजरातीत मोर आहे. पण संस्कृतात दोन शब्द. एक केकिन् दुसरा मयूर. केकिन् वरून मोराच्या आवाजाला केका म्हणतात... पण या 'मयूर' चे काय?

पुन्हा शोध. अनेक शब्दांशी मन अडून राहिले. शेजारपाजारी भेटणाऱ्या मयूरेश, मयूरापासून ते मयूरेश्वरापर्यंतचे अनेक संदर्भ मनात जागे झाले. शेवटी व्यत्पत्तिकोशाचा आधार शोधला. त्यात समजले ते नवीनच... मयूर हा संस्कृत शब्द मानला जातो पण तो मूळ आर्यपूर्व भारतातील ऑस्ट्रिक भाषेतून आला आहे. आर्य भारतात येण्यापूर्वी आदिवासी जमातीत जी भाषा

बोलली जाई ती आस्ट्रिक. आर्यांच्या आगमनामुळे देशाबाहेर जाऊन डोकावण्याचा विचार आला. इंग्रजीत याला पीकॉक म्हणतात हे माहीत होतेच. शिवाय Common Peafowl हेही नाव कळले. फ्रेंच भाषेत पाओन (Paon) तर जर्मन मध्ये फाऊ (Pfau) तर इंडोनेशियन भाषेत बेरंग मेरेक (Berungmerek)... कितीतरी नावे सापडली. मोराचे शास्त्रीय नाव आहे Pavo Cristatus अशी नावांची शोधाशोध.

भारतीय संस्कृतिकोशात मोर हे कार्तिकेयाचे वाहन असल्याचा उल्लेख आहे. मग सरस्वतीचे वाहन कोणते... आणि मयूरेश हे गणपतीचे नाव...? शाळेत सकाळी प्रार्थना म्हणताना हळूच खुणवायचा तो सरस्वतीच्या प्रतिमेतला मोर मनात नेहमी रुंजी घालत रहातो. त्या शाळेच्या दिवसात तर असे किती तरी बारीक सारीक संदर्भ मन टिपत असते.

मोर वाहन कुणाचा...? भारतीय संस्कृतिकोशात म्हटलय, ''सरस्वतीचे वाहन हंस मानले असले, तरी जैन संस्कृतीने व 'लोकमानसाने' मोर हेच तिचे वाहन कल्पिले आहे'' (लोकमानस हा शब्द महत्वाचा वाटला, बोलका वाटला.)



असा हा मोर! व्यवहाराची घाटणी पहा कशी असते, म्हणी आणि वाक्प्रचार तयार होताना, रुळताना भाषा घडत जाते. जसं भाषेचं तसंच इतर कलांचं. भाषेतल्या या म्हणी अर्थसादृश्य, नादमाधुर्य अशा नाना कारणांनी भाषेत जीव ओततात. भाषा जिवंत होताना, कला विकास पावताना आधार घेतात. त्यात महत्त्वाचं स्थान या सृष्टीचं आहे. भाषेच्या या धाटणीत, कुंचल्यांच्या रंगात 'मोरा मोरवा' कुठे आहे? पहा आठवून... अशा संदर्भातही मयुर नृत्याचा आढळ आहे.

• • •

तर या मोराची छाप एकूणच भारतीय जीवनावर खोलवर उमटलेली आहे. चित्रकला, काव्य, साहित्य, भाषा, शिल्पकला, नृत्यशास्त्र... किती उदाहरणे द्यावीत?

मराठी भाषेत 'मोर' शब्द उच्चारताच दोन म्हणी सहज आठवल्या. 'मोर नाचतो म्हणून लांडोर नाचते' ही एक म्हण. विणीच्या हंगामातले मयूर नृत्य फार देखणे असते. निसर्गनियमानुसार नर हा अतिशय आकर्षक असतो, तर लांडोर अगदीच साधी. तिला आकर्षित करण्यासाठी मोर पिसारा फुलवून नाचतो. मोराचा हा गुणधर्म आहे. पण अंगी नृत्याचा गुणधर्म नसताना लांडोरीने मोरसारखे नाचणे शोभेल काय? आपल्या कुवतीबाहेरचे काम केवळ अनुकरण-प्रियतेच्या हव्यासातून करणाराचेही लांडोरीसारखे होते. हा किती साधा अर्थ या म्हणीत दडलाय. साधर्म्य शोधत भाषेची वाटचाल चालतांना असा हा मोर लांडोरीचा संदर्भ या म्हणीत आला. तशीच एक दुसरी म्हण 'चोरावर मोर' शाळेत असतांना पहिल्यांदा ही म्हण ऐकली तेव्हा चोरावर मोरच का? घार का नाही? असा आचरट(?) प्रश्न विचारल्यावरून बाईंनी दिलेला दणका आठवणीतून गेला नाही. साधारण असे जाणवले की, म्हणीतले शब्द कीस काढत बसण्यासाठी नसतात. चार लोक सांगतात ना, मग आपणही ऐकायचं. पुढच्या केव्हाच्या तरी टप्प्यात म्हणी वाक्प्रचारांचे कोश चाळताना समजले, चोरावर मोर म्हणजे सवाई चोर. मोर हे निमित्त वर्णपुनरावर्तनाचं, 'ओ' 'र' च्या नादसाधर्म्याचं! उच्चारायला बरा शब्द सापडला तो 'मोर' म्हणून मोर बाकी अर्थ काही नाही.

कै. विनोबा भावे यांची प्रवचने वाचावीत अशी आहेत. सृष्टीतील परमेश्वर वर्णन करतांना त्यांनी मोराचा तोरा कसा अचूक टिपलाय ते म्हणतात, ''त्या पिसाऱ्यासमोर माणसाची सारी ऐट झक मारते. बादशहा नटतो, पण मोराच्या पिसाऱ्यासमोर तो अधिक काय नटणार?'' मोराचा हा बादशाही थाट अवर्णनीय आहे यात वादच नाही. पण या डामडौलामुळेच घमेंडी माणसात

आपला दोष न समजणे हाच मोठा दोष असतो.

मोराची गणना झाली. त्याचा पिसारा, डामडौल यामुळेच मोर पाळण्याचा छंदही निर्माण झाला. राजे - रजवाड्यांपासून अलिअलिकडील सरदारांपर्यंत किंवा हाय(!) सोसायटीतील उच्चभ्रू बंगल्यामधून मोर हा पाळीव झाला.

साहित्याचा शोध चाललाच होता. अनेक भाषा आपल्याला येत नसल्याने त्या त्या भाषांतील साहित्य कसे मोराने समृद्ध झाले आहे याचा अंदाज घेता येत नाही ही खंत होती. विशेषत: राजस्थान व गुजराथमधील बोली भाषांत तर मोर हसखास असणार. राजस्थानातल्या घराच्या परसापर्यंत धिटाईने येणारा हा पक्षी साहित्यात नक्कीच असणार. राजस्थानी चित्रकलेचे संदर्भ मनात जागे झाले. या चित्रशैलीवरही मोराचा किती प्रभाव आहे पहा. मोर आठवताच राजस्थानी चित्रशैलीतील पुष्करिणीवर किंवा सज्जावर बसलेल्या मोराशी मनातलं काही तरी सांगणारी युवती, तिच्या राजस्थानी पेहरावानिशी मनात भेटायला येते. याच चित्र शैलीत मालकंस रागाचं एक चित्र आहे. नायिका दासी व मोर हे ते चित्र. १८ व्या शतकातील भाषा (पहाडी) शैलीतील चित्र किंवा दीपावली वार्षिकातलं एके काळी आकर्षण असणारी दीनानाथ दलालांची चित्र मोरमय होऊनच आठवणीत येतात.

हिंदीतही मोर आहे, सुमित्रा नंदन पंतांची 'एक वाचाल' नावाची उपकविता आहे. कवितेचा सूर उपहासात्मक असल्याने त्यातील 'वाचाळ' मुलगा मात्र म्हणतो, ''मोर मुझे फुटी आँख नही भाता, कौए अच्छे लगते है।'' अगदी हलकं-फुलकं चित्रपट गीतही मोरमय झालंय आठवणीत. शतरंज नावाच्या सिनेमातलं ते गीत ''जंगल मे मोर नाचा किसने देखा...'' मनात कितीतरी दिवस घोळत राहिलं होत. 'मोर' या नावाचा नृत्य प्रकारही आहे. फेर धरून नाचणाऱ्या शाळेतल्या मैत्रिणींनी मनात रंगाळत ठेवलेला 'मोर' नाच... सोबतच्या दिवाळी अंकातल्या डॉ. द. भि. कुलकर्णींच्या 'सावित्री' वरील लेखानं अशाच मोरमय आठवणी जागवल्या. पु. शि. रेग्यांच्या काव्य प्रतिमेचे एक उत्कृष्ट स्वप्न म्हणजे ही 'सावित्री' नृत्यनिर्भर मनाच्या या अभिसारिकेच्या मनातही प्रियकरानं मोर बनून यावं... काय सुंदर काव्य आहे. पुस्तकाचं वेष्टन पुन्हा मोरमय. पद्मा सहस्त्रबुद्धे यांच... जुन्या आठवणी, पु. शि. रेगेंच्या कवितेच्या.

या मयूर नृत्याचा भारतीय नृत्य शैली व संगीत शास्त्रावरही खोलवर प्रभाव जाणवती. विशेषत: कथ्थक नृत्याचा यादृष्टीने होणारा विचार महत्त्वाचा आहे. ''मियाऽऽऽऊ'' हा मार्जाररवातील मोराचा टाहो हे खरे, पण या ''षडजंरौती'' वरच आमचं भारतीय संगीत आधारलंय.

असा हा मानवी जीवनाला समृद्ध करणारा मोर. अगदी लहानपणापासून गळ्यात हात टाकून फिरणारा मित्र, 'देवबाप्पा' यासाठी आठवत रहातो. निसर्गांच्या पार्श्वभूमीवर पहिल्यांदा या चित्रपटाचा मनातला कप्पा गदिमांच्या शब्द सहवासच वाढलाय. ग. दि. माडगूळकरांच्या शब्दांनी आशाबाईंच्या आवाजातून काय बहार केली आहे. पहा -

'पावसाच्या रेघात।  
खेळ खेळू दोघांत॥'

अशी खेळातली मैत्री करून गदिमा थांबले नाहीत तर ''निळ्या सवंगड्या नाच'' म्हणत गळ्यात हात टाकून फिरणारी मैत्रीच त्यांनी मोराबरोबर केली. खरं तर हे बालगीत बालगीताच्या वयाबरोबर संपल नाहीच. अजूनही कॅसेट लावताना वाढत्या वयात मनाला लहानपण देणार हे अवीट गाणं. असेच शब्द मनाच्या कोपऱ्यात दडलेल गाणे, कवी आठवत नाहीत पण ऐकलेले 'छोट' दिवस अंधुक आठवतात. 'थुई थुई नाच माझ्या अंगणात मोर, निळ्या निळ्या पिसाऱ्यांचा फुलव फुलोरा...'



सातरंगी कमानीखाली या निळ्या सवंगड्याच्या संगतीत मन कस हरखून जात. आपलं रहातच नाही, राहूच शकत नाही.

• • •

एक कथा आहे. त्या कथेत मोराला म्हटलंय, ''मोरा तुझे गेले पाय, आता रडून उपयोग काय...?'' कथेचा संदर्भ किती काव्यात्मक आहे पहा, मैना ही मोराची भाची. तिचे पाय ओबड धोबड. एकदा एका लग्नाला तिला जाव लागलं. अशा पायानं मी जाऊ कशी म्हणत ती मोर मामाकडे आली. 'लग्नाहून येताच पाय देऊन टाकीन म्हणाली' मोर बिचारा भोळा. त्यान आपले सुंदर पाय दिले मैनेला आणि मैनेचे पाय घेतले आपल्याला. दिवस संपले, वर्ष संपली ... युगही लोटली. मैनेनं पाय परत केलेच नाहीत. बारकाईने पहा मैनेचे पाय अतिशय सुंदर असतात. पिवळ्या धमक हळदी रंगाचे आणि मोराचे मात्र ओबडधोबड... नाचताना मोराच्या डोळ्यातून पाणी येतं, बिचारा उदासच असतो. त्यावरून त्याला म्हटलय, ''आता रडून उपयोग काय...'' बैल गेला नि झोप केला.

आणि अशीच एखादी सकाळ उजाडते. जुनं गाणे ओठांवर घोळवत दिवाळीच्या त्या दिवशी सकाळीच 'श्री ४२०' चित्रपटातील शाळामास्तरीण नर्गिस मनात गाण गात जागी झाली. 'इचका दाना बिचका दाना दाने उपर दाना...' आणि गाणं ऐकावस वाटलं. कॅसेट लावली. दुसऱ्या कडव्यात मन पुन्हा मोराच्या आठवणीत रमलं, काय सुंदर कोडं असणार कडव आहे पहा -

'एक जानवर ऐसा, जिसकी धूम पर पैसा

सर पे भी साज है बादशहा की जैसा ...

मोर 'साहित्यातला' पुन्हा भेटला!

मोरपिशी रंग - या रंगाचा संदर्भ आपल्या जीवनात अनेकदा येतो, एवढ्या मोठ्या पिसाऱ्यातला छोटंस पीस. पण किती आठवणी रुजवत वाढलं आपल्या बरोबर.

'मुघल-ए-आझम' सारखा चित्रपट आठवा, बादशहा पधार रहे है ... ही आरोळी ऐकू येत रहाते आणि डोळ्यासमोरच्या दरबार दृश्यात चवऱ्या ढाळणारे वारा घालणारे बादशहाचे नोकर मोराचा संदर्भ मनात आणतात. आपल्या ऐतिहासिक परिचयातला ही दृश्यं मोरचेलाची.

हाजी अलीला असताना अनेकदा दर्ग्यांचे दर्शन घ्यावे व मग मागील खडकांवर बसावे असा विचार करत ओहोटीच्या वेळी समुद्रातली वाट आम्ही चालून जायचो. त्या वाटेवर फकीर भेटत, मित्राला त्यांची अकारण भीती. मला मात्र एकच प्रश्न असायचा, यांच्या झोळीतही मोरचेला आहे. याचे हे काय करीत असतील? आणि त्याच लहानपणीच्या आठवणीतली एक आठवण... शाळेतल्या पिंपळाच्या पारावरची, एका मित्राने त्याच्या घरी असणाऱ्या मोरपिसांच्या पंख्यातलं (मोरचेलातल) एक पीस गुपचूप संध्याकाळी शाळा सुटल्यावर दिलं होत. पिंपळाच्या जाळीदार पानाचा डोळ्यांना होणारा दृष्टीस्पर्श आणि त्या मोरपीसाच्या हळूवार गालावरील स्पर्शतला तो मखमली

'टच' ... मनात रेंगाळणारे असेही क्षण मग मोरमय होतात.

या पिसावरून अशीच एक आठवण झाली, ती महापालिका मार्गांवरील फूटपाथच्या कडेला असणाऱ्या एका मुंबईकर बैदूची. या बैदूकडे विविध बाटल्या, वनस्पतीची खोडं तर होतीच पण एका कोपऱ्यात एक मोरचेलही होते. कॉलेज नुकतच सुरू व्हायचे (म्हणजे शिंग फुटायचे!) दिवस.

त्या बैदूला सहज गंमत म्हणून विचारलं 'मोर का पीस तुम क्यूं रखता है?' त्याचा धंदा होता तो तत्परतेनं बोलला. 'शरीर के उप्पर जो जखम होता है ना, उसके उप्पर फडके से या रूमाल से ये बांधनेका! इससे जखम अच्छा होता है' (हिंदी अर्थातच मुंबईतलं होतं) गंमत म्हणूनच ते मोरपीस आठ बाराण्याला विकत घेतलं. पण जखम व्हायच्या आत इलाज घरात आला त्यामुळे असेल ते मोरपीस जपून ठेवलं, तोवर त्याचा प्रयोग करावाच लागला नाही . . . उपयोग करावा अशी वेळ आली, तेव्हा मोरपीस शोधण जमलं नाही.




बँडेज ऐवजी मोरपीस बांधले तर जखम खरोखरच बरी होते का? तेव्हापासूनचा टांगता प्रश्न. संस्कृती कोशातील नोंदीनुसार हा लोकसमज आहे. अर्थात लोकसमजुतीचं तर्कशास्त्र फार वेगळं असतं. पण ज्या अर्थी अशी समजूत आहे त्या अर्थी वैद्यकीय दृष्टीने त्या समजुतीतील अर्थ शोधला पाहिजे. कारण पंजाब मध्ये कोणाला साप चावला तर विष उतरावे म्हणून मोराचे पीस वापरतात असा संदर्भ आहे.

लोकसमजुतीतला मोर आठवताना मोराचं रडणं पुन्हा आठवलं.

मोराच्या डोळ्यांतून पाणी येण्याबद्दल असंही सांगितलं जातं की हे पाणी म्हणजे आनंदाश्रू असतात. हे अश्रू लांडोर गिळते. हा आनंद तिच्या पोटात भावेनासा झाला की ती अंड्याच्या रूपाने तो व्यक्त करते मोरासंबंधीच्या लोकसमजुती खूपच असणार. सहज जेवढ्या उपलब्ध झाल्या, आठवणीत रुजलेल्या होत्या, त्या येथे मांडलेल्या आहेत, या शिवायही मोर आहेच तुमच्या आमच्या नावा गावातला आणि भारत देशाचाही . . .

भारतीय जन जीवनात मोर किती खोलवर प्रभाव पाडून गेलेला आहे. अर्थात येथे ठळकपणे आठवलेली आणि एकाच भाषेतल्या गावांची नोंद आहे. वैयक्तिक मर्यादांबद्दल मागील एका मयूरस्तोत्रात लिहिलं होतचं.



पुणे जिल्ह्यात हिंडण्याचा फारसा योग आला नाही. पण एका पावसवळ्यात भीमाशंकरच्या दाट जंगलाच्या मोहाने भीमाशंकराला जाण्याचा योग साधला होता. भीमाशंकरच्या अलिकडील गावात एस. टी. थांबली होती, उत्सुकता म्हणून दुकानांवरील पाट्या वाचत होतो. एका कुठल्याशा पाटीवर प्रोप्रायटर मोरमारे हे आडनांव वाचलं. तेव्हा आडनांवापर्यंत प्रभाव पाडणारा मोर जाणवला. मग शोधता शोधता पंजाबातील मुसलमान धर्मात एक मोर नावाची उपजात असल्याची माहिती मिळाली. आणि भिल्लांमध्येही मयूरी ही पोटजात असल्याची माहिती नव्याने मिळाली. मोरमारे या आडनावातून शोधता शोधता काही वन्य जमातीत मोराचे मांस खाण्याचा संदर्भ मिळाला.

पुणे जिल्ह्यातलं एक अष्टविनायकाचं ठिकाण, मोरगाव. या मोरगावाबद्दल वाचताना मयुरेशचा संदर्भ थोडासा लागला. या गाणपत्य पंथाचं आद्यपीठ असणाऱ्या गावाचं नाव मोरमय का . . .? अशी कथा आहे की या क्षेत्रात गणपती प्रथम अवतीर्ण झाला तो मोरावर बसून. दुसरंही एक कारण सांगतात, या क्षेत्राचा आकार मोरासारखा आहे म्हणून हे मोरगांव.

अवघं मानवी जीवन अशा संदर्भांमुळे मोर व्यापून टाकतो. भारतीय संकृतीतलं मोराचं हे असं अस्तित्व, पण आजच्या बदलत्या जीवन पद्धतीत . . .

दोन विद्यार्थ्यांचा एक संवाद आठवतोय. आपल्याला उत्तर माहीत असणारा (?) प्रश्न समोरच्याला विचारीत समोरच्या मित्राचं जी. के. (जनरल नॉलेज) टेस्ट कराचं आणि भाव खावा अशी एक पद्धत असते. एक 'क्ष' विद्यार्थी आपल्या मित्राला विचारीत होता -

''भारताचा नॅशनल फ्लॅग कोणता - ?''

उत्तर - बरोबर.

'क्ष' चा पुढचा प्रश्न - 'भारताचं राष्ट्रीय फ्लॉवर (फ्लॉवर म्हणजे फूल-भाजी नाही हे ऐकणारालाही चटकन समजतं) कोणतं !''

उत्तर - 'गुलाब !'

'क्ष' ला विलक्षण हुरुप आला, ''अरे गुलाब कसं असेल, सो सिंपल अरे कमळ इज नॅशनल फ्लॉवर . . .''

संवाद चालू असतो. पण मधल्याच एका प्रश्नावर मन केंद्रित होत. प्रश्न होता,

'इंडियाचा नॅशनल बर्ड कोणता?'

उत्तर - पॅरट

'काय तू, एवढंही येत नाही तुला?'' म्हणत 'क्ष' ने उत्तर सुधारलं, 'अरे पॅरट असलेच कसा, राष्ट्रीय पक्षी पीजन!'

'क्ष'किंवा 'य' च्या ज्ञानाची आणि अज्ञानाची कीव करावी की नाही हाही प्रश्नच आहे. कारण आजच्या 'मॉड' पद्धतीत जीवनाचे संदर्भच संस्कृती, परंपरा या 'आऊटडेटेड' (!) शब्दांशिवाय घडत आहेत. भारतीय जन जीवनाशी सर्वाधिक समरसून गेलेला पक्षी . . . उत्तर खरंच कठीण आहे. अनेक पक्षी आहेत. पण सर्वाधिक प्रभाव मोराचाच आहे म्हणून भारताचा राष्ट्रीय पक्षी 'मोर' होऊ शकला.

हे राष्ट्रीयत्वाचं चिन्ह ठरवतं कोण . . ? मोराला राष्ट्रीय पक्षी हा मान दिला कोणी अनेकांना गंमत म्हणून प्रश्न विचारला. काहींच उत्तर होतं पंडित नेहरूंनी. तर काहींचं इंग्रजांनी. भारतीय संस्कृती कोशात म्हटलंय मोर हहा राष्ट्रीय पक्षी असल्याचं भारत सरकारने १९६२ साली जाहीर केलं. भारत सरकारनं तरी ठरवलं कसं? तर अनेक पक्षी शास्त्रज्ञांचा सल्ला घेऊन बऱ्याच विचाराअंती मोर हा राष्ट्रीय पक्षी ठरला. १९६२ साली हे ठीक. पण दिवस कोणता . . .? खरं तर राष्ट्राची चिन्हे घोषित होतात ते दिवस त्या चिन्हांचे दिवस म्हणून घोषित व्हावेत. मोरासाठी

'मयूरदिन', वाघासाठी 'व्याघ्रदिन' . . . निदान अशा दिवसांमुळे बदलत्या जीवन पद्धतीत या चिन्हांची नावे तरी बदलती रहाणार नाहीत व 'जी.के.' ची कीव करावी लागणार नाही.

'वा! काय सुंदर पक्षी आहे नाही. . .' असं म्हणतं एखाद्या 'झू' मध्ये वर्णन करण्यापलिकडे आपल्या रसिकतेची धाव नसते. आपल्या जीवनाला समृद्ध करणारे हे संदर्भ त्यामुळेच झपाट्याने 'आउटडेटेड' होत रहातात. हे संदर्भ एकत्र करीत राहिलो तर या पक्षीराजाचं किंवा इतर पक्षी मित्रांचं महत्व आपण समजू शकू.




मोर हा स्थलनिवासी पक्षी आहे. पिसाऱ्यासकट मोरातील नराचा आकार सुमारे ६ ॥ फूटाहून अधिक असतो. लांडोर मात्र पिसारा नसल्याने ४ फूट इतकी असते. ज्या पिसाऱ्याचे आपल्याला आकर्षण असते तो पिसारा म्हणजे मोराचे वाढीव शेपूट असते. लांडोरीच्या शेपटीला असा पिसारा असत नाही. म्हणूनच तिला लांडोर म्हणतात. शेपटी हलवून मोराला हा पिसारा खालीवर करता येतो. या शेपटीला वीस पीसे असतात व त्यातील पिसांचे दांडे पांढरे असतात. त्यांच्या प्रत्येक पिसाला लांबसर असे परासारखे तंतू असतात. मध्यभागी एक गोल डोळ्याचा आकार असतो. त्याच्या पिसांत पिवळा, निळा, हिरवा, किरमजी, जांभळा अशा विविध रंगांची झाक असते. त्यामुळेच मोराचे पीस



मनाला मोहवून टाकते. मोराचे डोके, मान व गळा निळ्या रंगाचे असतात. पोटाचा भाग हिरवट काळसर असतो. त्याच्या निळ्या रंगातही हिरव्या पिवळ्या रंगाची छटा असते. त्यामुळे नाचताना पिसाऱ्यासवट मोर अतिशय सुंदर दिसतो.

मोराच्या डोक्यावरील तुरा हाही फार सुंदर असतो. या तुऱ्यातील पिसांचा रंग (ही पिसे २४ असतात) बुडाशी फिकट मध्ये हिरवा व कडेला निळा असतो. ज्या फेझंट या पक्षी वर्गात मोर मोडतो, त्या वर्गातील पक्ष्यांप्रमाणेच मोराचा देह स्थूल, गुबगुबीत असतो. पंख आखूड व कमी ताकदीचे असतात. त्यामुळे मोर जास्त उंच किंवा लांब उडू शकत नाही. मोराचा पिसारा हिवाळ्यात झडतो. पानगळीच्या दिवसात झाडाची पाने गळून पडावीत तशी त्याच्या शेपटीची पिसे झडून जातात. अशा पिसे झडलेल्या अवस्थेत मोर सहसा आढळत नाही, उदासपणे कुठे तरी नाहीसा होतो.

शेपटीला नवी पिसे फुटण्याचे दिवस म्हणजे वसंत ऋतुचे. सहाजिकच या पक्ष्यात विणीचा हंगाम जानेवारी अखेरीस ते ऑक्टोबर पर्यंत असतो. मोराच्या पायांचा संदर्भ मागे आलेला आहे. ओबडधोबड असणाऱ्या त्याच्या पायांचा व चोचीचा रंग काळसर उदी असतो. त्याची नावे देताना जे पिफौल असे नाव आले होते. त्यातील फौल या पक्षी वैशिष्ट्याचा त्याच्यात असणारा आढळ होता. फौल म्हणजे पायांनी जमीन उकरणे. या पक्ष्यांना उत्कोटक असे म्हटले जाते. जमीन उकरणे सोयीचे. ठरावे यास्तव त्याच्या



मागील बोटाच्या वरच्या बाजूस अरी असते. मोर सर्व भक्षक असला तरी जमिनीतील कीटक शोधणे या सोयीमुळे त्याला, शक्य होते. धान्य, गवताचे व कीटक, सरडे, छोट्या आकाराचे साप असे त्याचे खाद्य आहे. नैसर्गिक वातावरणात मोर पाण्याच्या आसपास दाट जंगलात राहणे पसंत करतो. अशा जंगलात दिवसभर त्याच्या वावर जमिनीवर असला तरी दुपारी व रात्री झाडाच्या शेंड्यावर मोर विश्रांती घेतो. या पक्षी वर्गातील इतर पक्ष्यांप्रमाणेच पहाटे ओरडणे ही त्याची सवय. पाणथळीवर पाणी पिण्यास मोर बिचकतच जातो कारण या पक्ष्याचा स्वभाव काहीसा भित्रा असतो. मोरांचा थवा पाणी पिण्यास जातो. तेव्हा एक दोन पक्षी सभोवताल लक्ष ठेवून असतात. वाघ, सिंहाची चाहूल या पक्ष्याला सर्वात आधी लागते. अशी चाहूल लागताच आरोळ्या ठोकीत अस्वस्थपणे झाडाच्या शेंड्यावरून मोर उडत रहातो या लाजऱ्या, बुजऱ्या, भित्र्या स्वभावामुळे तो सदोदित जागृत, सावध असतो.

मोराचे ओरडणे कर्कश व तार स्वरातील असते. त्याच्या पुनरुच्चार व त्या पुनरुच्चारित ध्वनीचा प्रतिध्वनी जंगल घुमवून टाकतात. मियॉऽऽ अ या मार्जार स्वरापाठोपाठ का आन् का आन् असा ६-७ वेळा मानेला हिसका देत मोर आवाज काढतो. मोर ओरडला की पाऊस पडणार असे मानतात. ढगांचा आवाज सुरू होताच मोर नृत्यानंदात रंगून जातो.

मोर बहुपत्नीक आहे. एक नर चार पाच लांडोरी असा त्याचा कुटुंबकबिला असतो. पण या जनानखात्यात कौटुंबिक जबाबदारी मोर संभाळत नाही. अंडी, पिले, घरटे हा भाग लांडोर संभाळते. लांडोर साधारण ३ ते ५ अंडी घालते. घरटे कांड्या, गवत याचेच असते. पण गवताच्या आश्रयाने जमिनीत एखादा खळगा बनवून तयार केलेले असते. अंडी पिंगट, बादमी रंगाची, ओबडधोबड असतात.

पावसाळ्याच्या आरंभी लांडोरीला खूष करण्यासाठी फुलवलेला पिसारा पसरवून नाचणारा मोर पहाणे फार चांगले वाटते. पिसाऱ्याची थरथर, रंगांची झळाळी आणि लांडोरीचे त्याच्याकडे पहाणे... सगळेच आगळे वेगवेगळे.

भारतात ५००० फूट उंचीपर्यंत हा पक्षी आढळतो. भारत, सिलोन, बांगलादेश या प्रदेशातील मोरा पेक्षा वेगळ्या प्रकारचा मोर आशियातच इंडोचायनात आढळतो. यातील नराचा रंग गर्द हिरवा व तुरा टोकदार असतो. यातील लांडोर भारतीय मोरापेक्षा अधिक चांगल्या रंगाची असते. इंग्रजीत याला जावानीस पीकॉक म्हणतात. जगात मोराच्या ज्या तीनच पोटजाती आहेत. त्यातील तिसरा प्रकार (काँगो पीकॉक) आफ्रिकेत आहे. या तिसऱ्या प्रकाराचा शोध १९३७ साली लागला. यातील मोराचा तुरा पांढरा व रंग चकचकीत काळा असतो. नराला पिसारा नसतो. या काँगो प्रकारातील मादी हिरव्या व चॉकलेटी रंगाची असते. या तीन प्रकाराखेरीज मोराचे प्रकार आढळत नाहीत. (द. अमेरिकेतील एका फुलांच्या झुडूपाला पीकॉक फ्लॉवर म्हणतात, ही माहिती जात जाता मिळाली)

तर असा हा झळाळत्या रंगाचा निळा सवंगडी, राष्ट्रीय पक्षी म्हणून मान मिळालेला, तुमच्या आमच्या मनाच्या कानाकोपऱ्यात अस्तित्व असणारा मोर!

**श्री. मोहन पाठक**

# परिसर वार्ता

## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (माध्यामिक विभाग)

**एलिमेंटरी व ईंटरमिजिएट चित्रकला श्रेणी परीक्षा २००८ - २००९ :**

| | एलिमेंटरी श्रेणी परीक्षा | ईंटरमिजिएट श्रेणी परीक्षा |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | ४० | ३३ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | ३३ | २४ |
| अ श्रेणी | ०१ | ०३ |
| ब श्रेणी | १० | ०९ |

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती वादविवाद स्पर्धा :**

दि. २३-०२-२००९ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयात चौथी वा. ना. बेडेकर स्मृती वादविवाद स्पर्धा संपन्न झाली.

स्पर्धेसाठी खालील विषय ठेवण्यात आलेले हाते.

1) Basic structure theory is an encroachment on the separation of powers.

2) 'Gandhian practices in legal profession' are obsolete today.

3) Live - in relationships shall not be legalised.

स्पर्धेसाठी ॲड. पद्मनाभ शेट्टी आणि ॲड. श्री. ए. बी. चौधरी हे परिक्षक म्हणून लाभले होते. तसेच विद्या प्रसारक मंडळाचे प्रतिनिधी म्हणून मंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. श्री. वि. करंदीकर उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि स्पर्धा चुरशीची व्हावी यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांनी स्पर्धेमागचा हेतू विषद केला.

मुंबई विद्यापीठाअंतर्गत सर्व विधी महाविद्यालयांना खुल्या असलेल्या या स्पर्धेत अकरा महाविद्यालयांनी नोंदणी केली होती. तर प्रत्यक्षात दहा महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धा अटीतटीची होऊन त्यात Goverenment Law College ने प्रथम, ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालयाने द्वितीय, तर न्यू लॉ कॉलेजने तृतीय क्रमांक पटकाविला.

परिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करताना विषयांची प्रशंसा केली. तसेच विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान वापरून विषयाचे ज्ञान मिळविल्याबद्दल कौतुक केले.

या दरम्यान श्रीमती मर्सी थॉमस यांनी गांधीजी आणि कायदा शिक्षण यावर सचित्र माहिती सादर केली. तसेच सौ. श्रीविद्या यांनी ३१ जानेवारी ०९ रोजी भांडुप येथे सादर केलेल्या गांधीजींचे विचार आणि कायद्याचे शिक्षण या निबंधावर आधारित माहिती दिली.

स्पर्धेचे समन्वयक म्हणून श्री. अरुण जालीसादगी व सौ. प्रज्ञा राजेबहादूर यांनी काम पाहिले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली त्यासाठी त्यांना प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांचे मार्गदर्शन लाभले.

**शब्दांकन : सौ. प्रज्ञा राजेबहादूर**
विधी महाविद्यालय

## पाचवा स्मृतिदिन

विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या पाचव्या स्मृतीदिनानिमित्ताने १४ एप्रिल रोजी व्याख्यानाचा कार्यक्रम विद्या प्रसारक मंडळाने आयोजित केला होता. थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे सकाळी १०.३० ला डॉ. दीपककुमार यांचे ''विज्ञान आणि समाज : वसाहतवादाच्या पार्श्वभूमीवर घ्यावयाचा बोध'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

विज्ञानाचा इतिहास हा डॉ. दीपककुमार यांचा व्यासंगाचा विषय आहे. इतिहास या विषयात त्यांनी दिल्ली विद्यापीठाची डॉक्टरेट संपादन केली असून सध्या ते झाकीर हुसेन सेंटर फॉर एज्युकेशनल स्टडीज, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली येथे इतिहासाचे (विज्ञान व शिक्षण) अध्यापन करतात.

सदर व्याख्यानास विद्या प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी व संबंधित मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्मृतिदिन व्याख्यानाचे हे पाचवे वर्ष आहे. गेली चार वर्षे चालू असणाऱ्या या उपक्रमात पुढीलप्रमाणे भाषणे झाली आहेत.

- **प्रथम स्मृतिदिन २००५ :**

**विषय** : भारत आणि संगणक

**वक्ता** : डॉ. दीपक फाटक

- **द्वितीय स्मृतिदिन २००६ :**

**विषय** : जागतिक अर्थकारणात आशियाई वर्चस्वासाठी शिक्षणाचे महत्त्व

**वक्ता** : प्रा. वाय. के. भूषण

- **तृतीय स्मृतीदिन २००७ :**

**विषय** : जागतिकीकरण आणि भारतीय अर्थकारण - परिणाम आणि दिशा

**वक्ता** : डॉ. विष्णू कान्हेरे

- **चतुर्थ स्मृतीदिन २००८ :**

**विषय** : भारतीय दर्शनशास्त्रामधील घटितार्थशास्त्र आणि विरचना

**वक्ता** : डॉ. आर. बाळसुब्रमनियन

●●●

### लाटांपासून वीज

३० वर्षांपूर्वी प्रथमच प्रस्थापित करण्यात आलेल्या सागराच्या लाटांपासून वीज निर्मितीचा विचार प्रत्यक्षात येण्याच्या दृष्टीने इंग्लंड, अमेरिकेत प्रयत्न चालू आहेत. वापर योग्य प्रमाणात ही ऊर्जा निर्मिती करण्यात काही अभियांत्रिकी स्वरूपाचा आव्हानांची अडचण आहे. २००३ मध्ये यु. एस. इलेक्ट्रीक पॉवर रीसर्च इन्स्टिट्यूटने (EPRS) अमेरिकेतील मागणीच्या ६% ऊर्जा पुरवली (255 TWh प्रतिवर्ष) (TWh टायड व्हेव हार्वेस्टिंग) जाऊ शकेल असा अंदाज केला. लाटांपासून वीज निर्मिती शक्य आहे. पण तिचा मोठ्या प्रमाणात वापर होईल अशी निर्मिती करण्यास लागणारा प्रकल्प उभारणे हे खर्चिक आहे.

'सायन्स' साप्ताहिकावरून
खंड ३३३, पृ. ११७६, २७ फेब्रु. २००९)

विनोद थट्टा करणारा नसावा.

**मुखपृष्ठावरून**
**संपादकीय**
**शिक्षण म्हणजे शाळा हे समीकरण चुकीचे आहे**

हे बदल, ही स्थित्यंतरे नात्यांत असतात त्यापेक्षा अधिक जबाबदाऱ्यांत असतात. या स्थित्यंतराचा, जबाबदाऱ्यांचा आदर करणे हे शिक्षण कोणत्या शाळेमधून मिळते? शाळा ही संकल्पना माहिती मिळवण्याचे व ती मिळवणाऱ्यांचे मूल्यमापन करण्याचे साधन अशी आहे. माहितीच्या या मूल्यामापनाला महत्त्व नक्कीच आहे. पण त्याचे यांत्रिकीकरण झाले की त्यातील मानव्य हरवते. घरात वडिल वडिलांसारखे वागत नाहीत, आई आईसारखी वागत नाही, शाळेत शिक्षक शिक्षकांसारखे वागत नाहीत. विद्यार्थीने मात्र गुणवान, मूल्यवान, वर्तणूक करावी हा आग्रह.

नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांचे उदाहरण घ्या. प्रत्येक राष्ट्रीय पक्षाने गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या प्रतिनिधींना उमेदवारी दिली आहे. या संदर्भातील चर्चांमधून याचे केलेले समर्थन इतके केविलवाणे असते की त्यामुळे हसण्यापेक्षा रडूच जास्त येईल. दावे-प्रतिदावे करणाऱ्या या व्यक्ती शिक्षित आहेत, अशिक्षित नाहीत.

थोडक्यात शालेय शिक्षण, परीक्षा, त्यांचा अधिकार व हे सर्व फुकटात मिळावे यांचा प्रगल्भ नागरिक बनविण्यात फार सीमित संबंध आहे. चारित्र्य, शील, संयम, त्याग या गोष्टींची आपण अवहेलनाच नाही तर थट्टा करून ठेवली आहे. चुकून अशा व्यक्ती जर का दृष्टोत्पत्तीस आल्या तर त्यांचे वागणे व्यवहारशून्य कसे आहे हे सांगण्यास आपण रकाने खर्च करत असतो. आपल्या कथा-कादंबऱ्या, नाटके, सिनेमे हे स्वैर, बेताल वर्तणुकीचे चित्रणच नाही, तर समर्थन करणारे असतात. आपले राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक नेतृत्व, नतद्रष्ट, भ्रष्ट, ढोंगी आहे. याला अपवाद नक्कीच आहेत; पण ते भिंग लावून शोधावे लागतील.

शिक्षणाची चर्चा जेव्हा आपण अधिकार, सरकारी जबाबदारी आणि मोफत एवढ्याच संदर्भात करत असतो तेव्हाच स्व-फसवणुकीस सुरुवात झालेली असते. अधिकारापेक्षा जबाबदारीची जाणीव, सरकारीकरणापेक्षा व्यक्ती व कुटुंबकेंद्रित आणि मोफत पेक्षा किंमत देऊन शिक्षण ही मनोधारणा आपण जिथवर निर्माण करू शकत नाही तिथवर या गुंत्यातून बाहेर येण्याची सुतराम शकत नाही.

दुसरा मुद्दा समानतेचा आहे. कोणत्याही दोन व्यक्ती समान नसतात. क्षमता, सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी भिन्न असतात. त्या नाकारणे येथेच पहिली अप्रामाणिकपणाला सुरुवात होते. इतरांची असामान्यता मान्य करणे म्हणजे विषमतेस खतपाणी घालणे असे नाही. समाजवादी हे नाव स्वीकारलेले अनेक राजकीय पक्ष आहेत. नुकत्याच झालेल्या निवडणुकात ज्यांचे अधिकारी, पदाधिकारी यांच्या संपत्तीची जेव्हा माहिती दिली गेली तेव्हा त्यातील फोलपणा सिद्ध झाला. ज्या महात्मा गांधींनी संयमित जीवनशैलीचा पुरस्कार केला, दारूचा तिरस्कार केला त्यांच्याच वस्तू स्वैराचारी जीवनशैली व दारूच्या धंद्यातून फायदा झालेल्या पैशातून विकत घेतल्या जातात, तेव्हा व्यक्ती व कृतीतील भयावह दरी लक्षात येते. म्हणूनच जिथपर्यंत शिक्षण म्हणजे शाळा हे समीकरण आपण घालून घेतो व सर्व जबाबदाऱ्या शिक्षक संस्था चालकांवर सोडून देतो, तिथपर्यंत या समस्यांची सुटका होणे दूरच, विचका होण्याची शक्यता अधिक आहे.

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**२५४२ ६२७०**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना नौपाडा, ठाणे १९३५

## *विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था*

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक विभाग)

२) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)

३) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (प्राथमिक विभाग)

४) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (माध्यमिक विभाग)

५) के. ग. जोशी कला महाविद्यालय व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय

६) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

७) वि. प्र. मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

८) डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

९) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन

१०) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन माहिती तंत्रज्ञान केंद्र

११) वि. प्र. मंडळाचे प्रगत अभ्यास केंद्र

## उपक्रम

- भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला
- डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान
- नारळीपौर्णिमा - संस्कृत दिन
- दिशा व्यासपीठ
- विद्या प्रसारक मंडळ - वर्धापनदिन
- ५ सप्टेंबर - दीक्षान्त समारंभ

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.